सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३६२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### कमाल खर्राजी यांचे निधन

**तेहरान :** इराण अमेरिका युद्धाबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. इराणचे माजी परराष्ट्र मंत्री कमाल खर्राजी यांचे गुरुवारी (९ एप्रिल) उशिरा रात्री निधन झाले. गेल्या आठवड्यात झालेल्या अमेरिकन हवाई हल्ल्यात ते जखमी झाले होते. या वृत्ताची पुष्टी इराणच्या सरकारी दूरदर्शनने केली आहे. त्यामुळे आता हे युद्ध कोणतं वळण घेणार याकडे संपूर्ण जगाचं लक्ष आहे. तेहरानमधील त्यांच्या निवासस्थानी हा हल्ला करण्यात आला होता. हल्ल्यानंतर त्यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. इराणी माध्यमे आणि स्थानिक अहवालांमध्ये याला 'हत्या करण्याचा प्रयत्न' असे म्हटले आहे.

### व्हॉट्सपच्या प्रायव्हसीवर वाद

**मुंबई :** सध्या व्हॉट्सपच्या प्रायव्हसी आणि सिक्युरिटीबाबत मोठा वाद समोर आला आहे. टेलिग्रामचे सीईओ पावेल दुरोव आणि टेस्लाचे मालक एलोन मस्क यांनी व्हॉट्सपच्या एन्क्रिप्शन सिस्टमवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते, WhatsApp वापरकर्त्यांना पूर्ण सुरक्षिततेची हमी देतो, मात्र प्रत्यक्षात ती तेवढी सुरक्षित नाही. दरम्यान, मेटा कंपनीने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. मेटा चं म्हणणं आहे की व्हॉट्सप मध्ये एंड-टू-एंड एन्क्रिप्शन वापरले जाते, ज्यामुळे पाठवलेले संदेश फक्त पाठवणारा आणि प्राप्त करणारा व्यक्तीच वाचू शकतो.

### न्या. यशवंत वर्मा यांचा राजीनामा

**अलाहाबाद :** अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्या. यशवंत वर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. न्या. वर्मा यांनी आपला राजीनामा राष्ट्रपतींकडे पाठवला असल्याची माहिती समोर आली आहे. मार्च २०२५ मध्ये त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जळलेली आढळल्याच्या न्या. वर्मा देशभरात चर्चेचा विषय ठरले होते.न्या. वर्मा दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना १४ मार्च २०२५ रोजी त्यांच्या दिल्लीतील सरकारी निवासस्थानी आग लागली होती.

# मुंबईत उभारणार भाडेतत्त्वावरील परवडणारी घरे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; ऑनलाईन पोर्टल तयार करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० एप्रिल** - मुंबईमध्ये नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने बाहेरून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यांच्याकरिता मोठ्या प्रमाणावर घरांची आवश्यकता असल्याने भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा उभारून कार्यान्वित करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले. तसेच भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी नागरिकांच्या सुविधांकरिता पोर्टल विकसित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.



भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांबाबत सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित बैठकीत ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईसह अन्य महानगरांमध्ये नोकरी, व्यवसायनिमित्त आलेल्या नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात भाडेतत्त्वावरील घरे असली पाहिजेत. मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर भाडेतत्त्वाने घरे उपलब्ध होतील, याची काळजी घेण्यात यावी. घरांसाठी मागण्यांसंदर्भातील करारानुसार सर्व कार्यवाही होईल, याबाबतही यंत्रणेने दक्षता घेतली पाहिजे. उपलब्ध असलेल्या भाडेतत्त्वावरील घरांबाबत यंत्रणेने समन्वयाने कार्यवाही केल्यास मालक व भाडेकरू या दोघांनाही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ अंमलबजावणीच्या सक्षमीकरण व सुलभी करणाबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या कायद्याअंतर्गत सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस उपायुक्त यांना नियुक्त करावे. पोलीस स्टेशन अथवा पोलिसांचे परिक्षेत्र वाढल्यास त्यानुसार आपोआप सक्षम अधिकारी वाढतील, अशी व्यवस्था करावी. पोलीस उपायुक्तांच्या कामकाज यादीमध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहण्याच्या कामकाजाचा समावेश करण्यासाठी अधिसूचना काढण्याची कार्यवाही करावी. भाडेदर संदर्भातील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी १०० विशेष न्यायालये स्थापन करावी. यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करावी.

न्यायालयाच्या परवानगीने भाडेदर संदर्भातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सायंकाळचे न्यायालय सुरू करावे या न्यायालयांसाठी जागा नसल्यास भाडेतत्त्वावर जागा घेण्यात याव्यात. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली निघतील, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

₹२५,000 कोटींच्या व्यवसायाची अभिमानास्पद वाटचाल, प्रगतीचा नवा अध्याय

७ राज्यात उपस्थिती

१६५ शाखांचे विस्तृत जाळे

लेखापरीक्षित निकाल

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | ३१-०३-२०२६ | ३१-०३-२०२५ |
|---|---|---|
| एकूण व्यवसाय | २५,३६० | २३,१०५ |
| ठेवी | १६,२४४ | १४,८४९ |
| कर्जे | ९,११६ | ८,२५६ |
| ढोबळ नफा | २८७ | २५२ |
| निव्वळ नफा | १५५ | १८५ |
| स्वनिधी | १,७७३ | १,६३९ |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ३.११% | ३.५९% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | 0.00% | 0.00% |
| पुंजी पर्याप्तता | १६.८९% | १७.४८% |

www.tjsb.bank.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466

# भाविकांची बोट नदीत उलटली, १० जणांचा मृत्यू

**लखनऊ/वृत्तसंस्था:** उत्तर प्रदेशच्या मथुरा जिल्ह्यात येणाऱ्या वृंदावनमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. यमुना नदीत बोट उलटली आहे. नदीतील पीपा पुलाजवळ भाविकांनी भरलेली एक बोट उलटली. या दुर्घटनेत १० भाविकांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत १४ जणांचा जीव वाचवण्यात यश आलं आहे. अनेक जण आताही बेपत्ता आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि मदत-बचाव करणारी पथकं दुर्घटनास्थळी पोहोचली.

मथुराचे डीएम चंद्र प्रकाश सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, यमुना नदीत सातत्यानं शोध मोहीम सुरु आहे. यासाठी पाणबुड्यांची मदत घेतली जात आहे. त्यांच्याकडून बेपत्ता लोकांचा शोध सुरु आहे. मथुरा जिल्हा




प्रशासन आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. ते परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. वृंदावनात बोट उलटल्याच्या घटनेची दखल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली आहे. त्यांनी मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांच्या नातेवाईकांबद्दल सहवेदना व्यक्त केल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. 'उत्तर प्रदेशच्या मथुरेत बोट उलटल्याच्या दुर्घटनेमुळे मला अतिशय दु:ख झालं. ज्या लोकांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावलं, त्यांच्यासोबत आमच्या सहवेदना आहेत. या दुर्घटनेत जखमी झालेले सर्व लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करतो. स्थानिक प्रशासन मदत करत आहे,' असं मोदी यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# अनंत अंबानी यांच्या पुढाकाराने जामनगरमध्ये वनतारा विद्यापीठाची स्थापना - वन्यजीव संरक्षण आणि पशुवैद्यकीय शास्त्राला वाहिलेले जगातील पहिले एकात्मिक गुरुकुल

**वनताराने जगातील पहिल्या वन्यजीव आणि पशुवैद्यक जागतिक विद्यापीठाची स्थापना केली. हे विशिष्ट हेतूसाठी निर्माण केलेले आधुनिक काळातील गुरुकुल होणार असून, वन्यजीव आणि पशुवैद्यक शिक्षण या क्षेत्रात देशाला जगात प्रमुख स्थान मिळावे हा यामागील हेतू आहे.**







**जामनगर, ९ एप्रिल :** रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वनतारा या जागतिक वन्यजीव संरक्षक संघटनेने गुजरातच्या जामनगरमध्ये वनतारा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली आहे. वन्यजीव संरक्षण आणि पशुवैद्यक शास्त्र या क्षेत्राला वाहून घेतलेले हे जगातील पहिले एकात्मिक जागतिक विद्यापीठ असेल.

पशु कल्याण क्षेत्रातील शास्त्रीय संशोधन वाढवणे तसेच वन्यजीव संरक्षणाचे भवितव्य या क्षेत्रांवर विद्यापीठाचा भर असेल. पशुवैद्यक औषधे, वन्यजीव संरक्षण आणि वन्यजीवांचे जतन या क्षेत्रात पुढील तज्ज्ञ निर्माण करणे, हे विद्यापीठाचे ध्येय आहे. या विद्यापीठाचे अभ्यासक्रम या क्षेत्रातील भारताच्या परंपरागत ज्ञानाचा वापर करून, या क्षेत्रातील शिक्षणाचे विशिष्ट हेतूंवर आधारित आणि भविष्यकाळासाठी सज्ज असे मॉडेल तयार करतील.

आपण वन्यजीवांच्या सेवेसाठी सहानुभूती, ज्ञान आणि कौशल्य यांच्या साह्याने आपले मन तसेच संस्था कशा घडवतो, यावर पशुसंवर्धनाचे भविष्य अवलंबून राहील. या वन्य जीवांना होणारा त्रास पाहणाऱ्या आणि त्यांची काळजी घेण्याच्या क्षेत्रात बरेच काही करण्याची आवश्यकता जाणणाऱ्या एका वैयक्तिक प्रवासातून वनतारा विद्यापीठ आकारास आले आहे. पुरातन नालंदा विद्यापीठाची मार्गदर्शक मूल्ये आणि 'आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः' हे ऋग्वेदातील बोधवाक्य, म्हणजेच आदर्श विचार सर्व दिशांनी आपल्याकडे येऊ दे. या बोधवाक्यानुसार, प्रत्येक जीवाचे संरक्षण करणारी नवी पिढी तयार करण्यासाठी हे विद्यापीठ कटिबद्ध आहे, असे अनंत अंबानी म्हणाले.

ही बोधतत्वे अधोरेखित करणारे दोन बिजोलिया पाषाण, विद्यापीठाच्या भूमिपूजनाच्या जागीच उभारले आहेत. पुरातन विंध्यन संस्कृतीची परंपरा सांगणारे हे पाषाण सध्याच्या बिहारमध्ये असलेल्या पुरातन नालंदा विद्यापीठाची परंपरा सांगतात. हे पाषाण भारताच्या ज्ञान आणि शिक्षणाच्या समृद्ध परंपरेचे प्रतीक आहेत.

विद्यापीठाचा भूमिपूजन समारंभ हिंदू परंपरेनुसार झाला. यावेळी शिक्षण शास्त्र, वन्य जीव जतन आणि सार्वजनिक क्षेत्रातील अनेक मान्यवर हजर होते. यात अनंत अंबानी यांचे शिक्षक आणि त्यांना घडवणारे थोर व्यक्तिमत्वे हजर होती. जल, माती आणि पाषाण यांची धार्मिक परंपरागत पद्धतीने स्थापना करून त्याद्वारे प्रतिकात्मक पायाभरणी करण्यात आली. हे सर्व भाग, भारताच्या वेगवेगळ्या जैवविविधतेने समृद्ध असलेल्या ठिकाणांवरून म्हणजेच गवताळ भाग, जंगल, पाणथळ क्षेत्र, हिमालय आणि अन्य पर्वतरांगा येथून आणले होते. भारताच्या उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम आणि मध्य भागातून आणलेले हे भाग, भारताच्या समृद्ध पर्यावरणाचे आणि देशाच्या समृद्ध नैसर्गिक वारशाच्या पायावर आधारित विद्यापीठ उभारण्याच्या दूरदृष्टीचे प्रतीक होते.

वनतारा विद्यापीठ या क्षेत्रातील भिन्नभिन्न विद्या शाखांचे एकाच शैक्षणिक परियंत्रणेत एकत्रिकरण करेल. आजच्या जगातील वन्यजीव संरक्षण व्यवस्थेशी हा अभ्यासक्रम निगडित असेल. वनताराने या क्षेत्रात आतापर्यंत केलेल्या कामाच्या अनुभवाचा लाभ घेऊन हे विद्यापीठ, हा प्रत्यक्ष अनुभव आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमात, व्यावसायिक प्रशिक्षणात आणि जागतिक आराखड्यात समाविष्ट करेल. प्राण्यांविषयीची दयाभावना, शास्त्र आणि वन्यजीवांचे जतन, या सर्व बाबी एकत्रित करून या विद्यापीठात तज्ज्ञ व्यावसायिकांनी वन्यजीव आणि त्यांच्या परियंत्रणेचे आरोग्य, यांच्याशी संबंधित गुंतागुंतीच्या आव्हानांवर मात करावी, त्यावर तोडगा काढावा, यासाठी त्यांना सज्ज केले जाईल.

### वनताराबाबत

**वनतारा हा वन्यजीव सुरक्षा, पुनर्वसन, आरोग्य सेवा आणि जतन यासाठी गुजरातच्या जामनगरमध्ये स्थापन केलेला उपक्रम आहे. आधुनिक पशुवैद्यक औषधी शास्त्र, संगोपन आणि काळजी तसेच प्राणीजतनाचे मोठ्या प्रमाणावर नियोजन यांचे एकत्रीकरण करून वनतारा विशेष औषध उपचार, निगा आणि वेगवेगळ्या जातीच्या प्राण्यांची दीर्घकालीन काळजी घेण्यास सज्ज आहे. बंदिस्त वातावरणात प्राण्यांची पुनरुत्पत्ती, अस्तंगत होत चाललेल्या प्राण्यांची संख्या वाढवणे तसेच वन्य जीवसृष्टी वाढवणे यात मोठा सहभाग घेणारी वनतारा ही वन्यजीव आरोग्य, पशु जतनशास्त्र आणि दुमिर्ळ प्रजातींची पुनर्स्थापना या क्षेत्रात ख्यातनाम संस्था म्हणून नावारूपाला येत आहे.**

या विद्यापीठात पदवीपूर्व, पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच विशेष अभ्यासक्रम असतील. यात वन्य जीव औषधे आणि शस्त्रक्रिया, पोषण त्यांची वर्तणूक शास्त्र, त्यांची अनुवंशिकता, साथीचे रोग, आरोग्य संरक्षणाचे धोरण तसेच नैसर्गिक पशुसंवर्धन पूरक वातावरण निर्मिती यांचा समावेश राहील. वनताराच्या कामाशी सुसंगत अशी क्षमता असलेल्या विशेष महाविद्यालयांमध्ये विद्यापीठातर्फे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीदेखील दिली जाईल. या विद्यापीठात अत्याधुनिक शैक्षणिक आणि वैद्यकीय पायाभूत सुविधा, वेगवेगळ्या प्रकारचे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि निवासी संकुल असेल. पशु संगोपन आणि आधुनिक पशुसंवर्धन पद्धती यांना सक्षम करण्यासाठी कृती आधारित संशोधनावर विद्यापीठ भर ठेवेल. संवर्धन क्षेत्रातील नव्या जुन्या पद्धतीचे एकत्रीकरण करून वन्यजीवांची नैसर्गिक जीवन पद्धती आणि वन्यजीवांची शास्त्रीय काळजी तसेच त्यांचे दीर्घकालीन कल्याण आणि व्यवस्थापन यांची सांगड येथे घातली जाईल.

पशुसंवर्धनाचे भविष्य हे महाविद्यालयातील वर्गांमध्ये, प्रयोगशाळांमध्ये, माणसांच्या सद्विवेक बुद्धीमध्ये तसेच जंगलांमध्ये निर्माण होईल, हे ध्यानात घेऊन वन्यजीव पशुवैद्यक शास्त्र आणि पशुसंवर्धन शिक्षण यांचे आधुनिकीकरण करण्याचा विद्यापीठाचा निर्धार आहे. त्याचबरोबर वन्यजीव आरोग्य, प्राण्यांची निगा राखण्याच्या वातावरणाची निर्मिती आणि पशुसंवर्धन यांचे ज्ञानभंडार विकसित करून या क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि नवकल्पना यांच्यासाठी ते दीर्घकालीन व्यासपीठ म्हणून उपयोगात येईल, याचा प्रयत्नही याचवेळी विद्यापीठातर्फे केला जाईल.

दयाबुद्धीचे पशुसंवर्धन प्रशिक्षण सुरू करण्याच्या राष्टीय प्रयत्नांची दखलही पायाभरणी समारंभात घेण्यात आली. या दृष्टीने 'वनतारा युनिव्हर्सिटी फाऊंडिंग फेलोज' आणि 'एव्हरी लाईफ मॅटर्स' या शिष्यवृत्त्यांची घोषणा करण्यात आली. ज्ञानाचा उपयोग केवळ प्रगतीसाठीच नव्हे, तर संरक्षणासाठीही करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

वनतारा विद्यापीठ हे शैक्षणिक व्यवस्थेपेक्षाही वेगळ्या स्तरावर असल्याचे उद्दिष्ट अधोरेखित करण्यात आले आहे. वन्यजीव संरक्षणासाठी केवळ प्रशंसाच नव्हे तर ज्ञानव्यवस्था आणि प्रशिक्षित व्यक्तींची गरज असल्याचेही त्यातून स्पष्ट होते.

# १.३९ कोटी रुपयांच्या नाली कामाचे नगराध्यक्षांच्या हस्ते शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १० एप्रिल :** निलंगा शहरातील लातूर-बिदर रोडवरील अंबिका देवी मंदिर ते म्हाडा वस्ती मार्गे शिवाजी विद्यालय मुख्य रस्ता तसेच म्हाडा वस्ती ते दफनभूमीपर्यंत १ कोटी ३१ लाख खर्चातून सुमारे १७०० मीटर लांबीचे नाली बांधकाम होत आहे. या महत्त्वाकांक्षी कामामुळे परिसरातील पाणी निचरा व्यवस्था सक्षम होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात पाणी साचणे, निचऱ्याची अडचण आणि अस्वच्छतेच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या या भागात अखेर नाली विकासकामाला सुरुवात झाली आहे.

निलंगा शहरातील शिवाजी नगर भागातील प्रभाग क्रमांक ५ व ६ मध्ये या कामाचा शुभारंभ निलंगा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. यावेळी नगरपरिषदेच्या नगर अभियंता ऐश्वर्या महामाने, स्वछता सभापती सुधा वाघमारे, नगरसेवक खदीर मासुलदार, नगरपालिकेचे सल्लागार अभियंता अजय शिंदे, विशाल सांडूर, अहेमद शेख यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या विशेष प्रयत्नातून तसेच युवानेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कामाला गती मिळाली आहे.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष संजयराज हलगरकर म्हणाले या नाली विकासकामामुळे पावसाळ्यातील पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार असून परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी होण्यास मदत होईल. संबंधित ठेकेदारास काम उच्च दर्जाचे, टिकाऊ आणि नागरिकांच्या गरजांना पूरक असेच करावे, अशा स्पष्ट सूचना दिल्या. हे काम केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात नागरिकांच्या समस्या दूर करणारे असावे, असेही त्यांनी नमूद केले. नाली विकासकामाच्या शुभारंभानंतर या भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागातील नागरिकांनी आमदार निलंगेकर यांचे आभार मानले.

### आमदार निलंगेकर यांची दखल, प्रश्न मार्गी

समस्या कायमस्वरुपी दूर होईल गेल्या अनेक वर्षांपासून आम्हाला पावसाळ्यात पाणी साचण्याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नव्हता. मात्र आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी याची दखल घेत पुढाकार घेतल्यामुळे आज हे काम सुरू झाले, ही आमच्यासाठी मोठी दिलासादायक बाब आहे. या नाली बांधकामामुळे आमच्या भागातील स्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील.

**–बालाजी रुपनर, नागरिक,**
**शिवाजी नगर, निलंगा**

## संक्षिप्त...

### शासकीय योजना सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचवा -सभापती सुरज पाटील



**त भा वृत्तसेवा**

**अहमदपूर :** शासकीय योजना सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचवा असे प्रतिपादन अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज बाबासाहेब पाटील यांनी शिरूर ताजबंद येथे केले.

शिरूर ताजबंद येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी जि.प. समाजकल्याण सभापती उत्तमरावजी माने, उपविभागीय अधिकारी मंजुषाताई लटपटे, अहमदपूर तहसीलदार उज्वलाताई पांगारकर, गटविकास अधिकारी पंकज शेळके, पंचायत समिती सदस्य कृष्णराज भोसले, पंचायत समिती सदस्य रवींद्र बोडके, सरपंच मच्छिंद्र वाघमारे, तालुका कृषी अधिकारी बावगे साहेब, मुख्याध्यापक दीपकराव भराटे, पत्रकार राजकुमार सोमवंशी, पत्रकार बालाजी पडोळे, ग्रामविकास अधिकारी घुगे, विनायकराव पाटील, ग्रामपंचायत सदस्य शुभम सारोळे, ग्रामपंचायत सदस्य दीपक वाघमारे, तसेच शिरूर ताजबंद गटातील सर्व सरपंच चेअरमन प्रशासकीय अधिकारी पत्रकार बांधव ग्रामस्थ उपस्थित होते.

यापुढे बोलताना सभापती सुरज बाबासाहेब पाटील म्हणाले की, या शिबिराच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या जाणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात आणि त्यांना त्याचा लाभ मिळावा, हा या अभियानामागचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

### कै. रसिका महाविद्यालयाचा भागवत व दयानंद खेळाडूंची पोलीस दलात निवड



**तभा वृत्तसेवा**

**देवणी :** कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी गोंडगाव भागवत नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलात तर दयानंद कांबळे यांची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्था सचिव गजानन भोपणीकर यांच्या शुभहस्ते गोंडगाव भागवत व दयानंद कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, क्रीडा संचालक प्रा.डॉ. सचिन चामले उपस्थित होते.तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गोंडगाव भागवत व दयानंद कांबळेचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### कारच्या अपघातात महिलेचा जागीच मृत्यू



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ :** तालुक्यातील चांमरगा ते बोळेगाव पाटी दरम्यान नळेगाव उदगीर रोडवर दोन कारची समोरा समोर धडकून दि ७ एप्रिल २६ रोजी सायंकाळी ५ च्या दरम्यान उदगीर कडून लातूर कडे जाणाऱ्या कार मधील अपघाता दरम्यान महिलेचा जागीच मृत्यु झाला तर इतर चार जण गंभीर जखमी झाल्याची माहिती पोलीसा कडून देण्यात आली. अपघात स्थळी चाकूर पोलीस ठाण्याची व शिरूर अनंतपाळचे पोलीस उशीरा पोहचल्याचे समजले.

शिरूर अनंतपाळ पोलीसा कडून मिळालेल्या माहिती वरून दोन्ही कार उदगीर येथीलच असून उदगीरहून लातूरकडे कार मध्ये जात असताना उदगीर शहरातील मोहिनी वैजनाथराव डोईजोडे वय ७० वर्षे रा. उदगीर या अपघातात गंभीर जखमी होऊन त्या जागीच ठार झाल्याची घटना घडली असून त्यांच्या गाडीतील कनिका बाबुराव डोईजोडे व अँड राजकुमार नावंदर रा उदगीर हे गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली दुसऱ्या कार मधील ड्रायव्हरचे दोन्ही पाय फॉक्चर झाल्याचे सांगीतले व समोर बसलेल्या पुरुषाला गंभीर मार लागला असून मागील सिट वर बसलेली महिला व लहान लेकरु बाल -बाल बचावल्याचे अपघाता दरम्यान प्रत्यक्ष दर्शनी असलेले साकोळचे माजी सरपंच अब्दुल अजिज मुल्ला यांनी सांगीतले गंभीर जखमीना म्बुलन्स व्दारे त्यांना लातूर येथे उपचारासाठी पाठविण्यात आल्याची माहिती साकोळ येथील माजी सरपंच अब्दुल अजिज मुल्ला यांनी तरुण भारत च्या प्रतिनिधीशी सांगीतले .

मयत महिलेला शिरूर अनंतपाळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केल्याची माहिती पोलीस निरीक्षक अनंत भंडे याना संपर्क साधला असता माहिती दिली इतर जखमीचे नावे आम्हाला पण समजले नाहीत अशी माहिती पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांनी दिली

## पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरातील हॉलीबॉल आणि बॅडमिंटन मैदानाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० एप्रिल :** पोलीस दलाच्या दैनंदिन ताणतणावपूर्ण व जबाबदारीच्या कामकाजातून पोलिसांना मानसिक व शारीरिक दिलासा मिळावा, तसेच त्यांच्या अंगी असलेली खेळाडू वृत्ती जोपासली जावी या उद्देशाने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात नव्याने उभारण्यात आलेल्या हॉलीबॉल आणि बॅडमिंटन मैदानाचे उद्धाटन पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. उद्धाटनानंतर पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप आणि पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासोबत प्रत्यक्ष हॉलीबॉल खेळून खेळाडूंचा उत्साह वाढविला.

या वेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, तसेच इतर वरिष्ठ अधिकारी, पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत करून पोलीस दलातील आरोग्यदायी उपक्रमांना चालना मिळत असल्याचे मत व्यक्त केले.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या दूरदृष्टीतून व संकल्पनेतून या हॉलीबॉल आणि बॅडमिंटन मैदानाची निर्मिती करण्यात आली आहे. पोलीस दलामध्ये सतत चालणाऱ्या धावपळीच्या व तणावपूर्ण कामामुळे अनेकदा शारीरिक व मानसिक थकवा जाणवतो. या पार्श्वभूमीवर पोलिसांना त्यांच्या मोकळ्या वेळेत खेळाची संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज ओळखून हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

सदर मैदानामुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांना त्यांच्या कामकाजानंतर उपलब्ध वेळेत नियमितपणे हॉलीबॉल आणि बॅडमिंटन खेळता येणार असून, त्यातून त्यांचे शारीरिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होणार आहे. खेळामुळे मानसिक ताणतणाव कमी होऊन कार्यक्षमता वाढण्यासही मदत होत असल्याने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या मैदानाच्या निर्मितीसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर तसेच पोलीस अंमलदार रामलिंग शिंदे यांनी पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या या योगदानाचे कार्यक्रमादरम्यान विशेष कौतुक करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सांगितले की, पोलिसांचे काम हे अत्यंत जबाबदारीचे व तणावपूर्ण असते. अशा परिस्थितीत शारीरिक तंदुरुस्ती व मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी क्रीडा उपक्रम अत्यंत आवश्यक आहेत. अशा प्रकारचे उपक्रम पोलीस दलामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात व कार्यक्षमता वाढवितात. त्यामुळे भविष्यातही अशा प्रकारचे क्रीडा व आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## लातूर जिल्हा परिषदेत सामाजिक समता सप्ताहास प्रारंभ; महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा जागर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० एप्रिल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण व दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने 'सामाजिक समता सप्ताहा'चे आयोजन करण्यात आले असून, बुधवारी या सप्ताहाचा उत्साहात प्रारंभ झाला. जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ८ ते १४ एप्रिल या कालावधीत राबविल्या जाणाऱ्या या विशेष सप्ताहाच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा प्रसार आणि महापुरुषांच्या समतेच्या विचारांचा जागर संपूर्ण जिल्ह्यात केला जाणार आहे. या उद्धाटन प्रसंगी लातूर येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार विजेते बालाजी धोंडीराम पवार यांचा सत्कार करण्यात आला. या सप्ताहाच्या निमित्ताने जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळा, दिव्यांग शाळा आणि शासकीय वसतिगृहांमध्ये मानवी हक्कांवर आधारित व्याख्याने, निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार असून, सर्व शाळांनी यात सक्रीय सहभागी व्हावे, असे आवाहन संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

## भारतीय सैन्यातील सेवा ही केवळ नोकरी नसून राष्ट्रमातेची सेवा - माजी जि.प.अध्यक्ष राहुल केंद्रे



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १० एप्रिल :** भारतीय सैन्यातील सेवा ही नोकरी नसून ती राष्ट्रमातेच्या चरणी अर्पण केलेली साधना आहे. सैनिक आपल्या कुटुंबापासून दूर राहून, प्रत्येक क्षण देशासाठी जगतो. त्यांच्या त्यागामुळेच आपण निर्धास्त आहोत. अशा वीरांना सलाम करणे हे आपले कर्तव्यच नाही, तर अभिमान आहे. भारतीय सैन्यातील सेवा ही केवळ नोकरी नसून ती राष्ट्रमातेची सेवा आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांमुळे आपण सुरक्षित आहोत. त्यांच्या त्याग आणि समर्पणामुळेच देशाची अखंडता टिकून आहे. आसे मनोगत माजी जिल्हापरिषद अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी

हिप्परगा ता. उदगीर येथील सुपुत्र व भारतीय सैन्य दलात दीर्घकाळ सेवा बजावलेले सैनिक राम पंढरी कानुरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त गावकर्यांनी आयोजीत केलेल्या भव्य सत्कार कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. देशसेवेसाठी दिलेल्या त्यांच्या योगदानाचा गौरव करत गावकऱ्यांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करत सन्मान केला.या भावनिक आणि प्रेरणादायी सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र तिरूके, यमुनाजी भुजबळे, माजी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब मरल्लापल्ले, चंद्रकांत टेंगेटोल तसेच सरपंच गणेश कानुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना माजी जिल्हापरिषद अध्यक्ष राहुल केंद्रे म्हणाले देशाच्या सीमेवर उभा राहून प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेची जबाबदारी खांद्यावर घेणारा वीर आज तोच वीर आपल्या मातीत परतला आहे.भारतीय सैन्यातील सेवा ही केवळ नोकरी नसून ती राष्ट्रमातेची उपासना आहे. आपल्या सुखासाठी सैनिक आपले कुटुंब, आनंद आणि आयुष्य सीमारेषेवर अर्पण करतो. अशा वीरांचा सन्मान करणे म्हणजे देशभक्तीचाच खरा अर्थ आहे.आसे ते म्हणाले.

गावात त्यांच्या स्वागतासाठी जणू उत्सवाचे रूप धारण झाले होते. फुलांचा वर्षाव, टाळ्यांचा कडकडाट आणि भारत माता की जय च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. प्रत्येकाच्या नजरेत अभिमान आणि कृतज्ञतेची चमक होती कारण हा सत्कार केवळ एका व्यक्तीचा नव्हता, तर देशासाठी जगलेल्या देशसेवेचा सत्कार होता.

कार्यक्रमाच्या शेवटी एकच भावना प्रत्येकाच्या मनात उमटली ज्यांनी आपल्यासाठी आयुष्य अर्पण केले, त्यांना सलाम करणे हीच खरी देशभक्ती! यावेळी मोठयाप्रमाणावर ग्रामस्थ उपस्थीत होते.

## अहमदपूर तालुक्यात SIR मॅपिंगसाठी विशेष कॅम्प; मतदारांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १० एप्रिल :** अहमदपूर तालुक्यातील सर्व मतदारांसाठी SIR (Special Intensive Revision) मॅपिंग प्रक्रियेअंतर्गत विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. हा कॅम्प दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत तालुक्यातील सर्व विधानसभा मतदान केंद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे.



या मोहिमेद्वारे सन २००२ च्या मतदार यादीनुसार SIR मॅपिंगची प्रक्रिया राबविण्यात येणार असून, ही संपूर्ण प्रक्रिया मोबाईल ॲपच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. ज्या मतदारांकडे सन २००२ मधील त्यांच्या नावाची नोंद (राज्य, जिल्हा, विधानसभा मतदारसंघ व यादी भाग क्रमांक) उपलब्ध आहे, त्यांनी ती माहिती आपल्या संबंधित बी.एल.ओ. (Booth Level Officer) यांना सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे मॅपिंगची प्रक्रिया अधिक सुलभ व जलद होण्यास मदत होणार आहे.

सर्व मतदान केंद्रांवर बी.एल.ओ. उपस्थित राहणार असून, त्याच ठिकाणी SIR मॅपिंगची कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी आपल्या जवळच्या मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपले मॅपिंग पूर्ण करून घ्यावे, असे प्रशासनाने कळविले आहे.

विशेष म्हणजे, ज्या मतदारांनी डखठ मॅपिंग प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत. त्यामुळे प्रत्येक मतदाराने ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी, २३६-अहमदपूर विधानसभा मतदारसंघ तसेच सहायक मतदार नोंदणी अधिकारी संघ तथा तहसीलदार उज्वला पांगरकर यांचेकडून करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे यशस्वी आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १० एप्रिल :** तालुक्यातील पान चिंचोली येथे शुक्रवार दि.१० एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर (टप्पा क्र. १) मंडळ विभाग पानचिंचोली येथे उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिराच्या माध्यमातून शासन आपल्या दारी हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.

या समाधान शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या लोकाभिमुख योजना व सेवा नागरिकांना थेट गावपातळीवर उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे व वगळणे, शेत रस्ता व पांदन रस्ता खुला करणे, मतदार यादीत नाव समाविष्ट व वगळणे, आरोग्य सेवा, ग्रामपंचायत व पंचायत समिती मार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा, आधार कार्ड दुरुस्ती, श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना आदींचा समावेश होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पानचिंचोलीच्या सरपंच मा. सौ. गीतांजली ताई हणमंते या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी मा. शरदजी झाडके, तहसीलदार मा. प्रसाद कुलकर्णी, नायब तहसीलदार मा. प्रवीण आळंदकर (म-१), मा. कुलदीप देशमुख, तसेच जिल्हा परिषद सदस्य मा. रोहित पाटील, मा. मानसी मरुरे, पंचायत समिती निलंगा सभापती मा. सौ. डॉ. सुनीता संतोष वाघमारे, प.स. सदस्य श्रीमंत हणमंत जाधव, शिल्पा परमेश्वर शिंदे, उपसरपंच बब्रुवान नागोराव जाधव, तंटामुक्त अध्यक्ष रामभाऊ पाटील, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन काकासाहेब रावसाहेब पाटील, लोकमान्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विक्रम धोंडीराम पाटील, धनराजजी गीते (भटके विमुक्त विकास परिषद, लातूर - सहयोजक), स्वरूप धुमाळ (सरपंच, शेडोळ) आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात विविध विभागांचे १५ पेक्षा अधिक स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉलच्या माध्यमातून अनेक गरजू लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले तसेच विविध योजनांची माहिती देण्यात आली.



या समाधान शिबिराचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. शासनाच्या सेवा व योजना थेट गावपातळीवर उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे सामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यास मोठी मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी मा. शरदजी झाडके यांनी उपस्थित नागरिकांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. कुलदीपजी देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन मंडळ अधिकारी निळकंठ जाधव व दडे सर यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळातील ग्राम महसूल अधिकारी अमर सुरवसे, गणेश पानखडे, विशाल तावरे, किशोर चव्हाण, दिगंबर वाघे, विजय सोमवंशी यांनी मोलाचे सहकार्य केले.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लोहीग्राममध्ये समाधान शिबिरातून ३८४ लाभार्थ्यांच्या स्वप्नांना मिळाली उभारी

**कृषी योजनेअंतर्गत रमाकांत काळे यांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप, प्रशासनाच्या गतिमान कामाचे सर्वत्र कौतुक**

**परभणी,/प्रतिनिधी -** - शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी लोहीग्राम येथे शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सोनपेठचे तहसीलदार सुनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या विशेष मोहिमेअंतर्गत शेळगाव मंडळातील एकूण ३८४ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यात आला.



लोहीग्राम येथील समाधान शिबिरामध्ये ग्रामस्थांना जागेवरच सेवा व प्रमाणपत्र मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले. समाधान शिबिरात लोहीग्राम सरपंच अस्मिता अनंतराव हिक्के, कान्हेगाव सरपंच माणिक कोरडे, नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल, मंडळ अधिकारी ज्योती प्रधान, उप कृषी अधिकारी मोतीराम भंडारे, पशुसंवर्धन अधिकारी एस.एम.डाके, भूमी अभिलेख विभागाचे महेश काकडे, ग्राम महसूल अधिकारी अमोल स्वामी,बालाजी नागदे, बाबाराव हरकळ, संघप्पा देशमुख, शाहुराज दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात नायब तहसीलदार श्री.चंदेल यांनी स्वतः लाभार्थ्यांशी संवाद साधला आणि पात्र नागरिकांना शिधापत्रिका, संजय गांधी निराधार योजना, सातबारा नोंदी, नमुना ८-अ, फेरफार नोंदी, डिजिटल सातबारा, प्रमाणपत्रे, कृषी, आरोग्य, भूमी अभिलेख विभागाच्या योजनांचे तात्काळ वाटप केले. प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणून सामान्य नागरिकांचे प्रश्न त्यांच्या दारी जाऊन सोडवणे हाच या शिबिराचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन नायब तहसीलदार श्री.चंदेल यांनी यावेळी केले. ''अधिकारी स्वतः आमच्या गावात आले, यामुळे आमचा वेळ आणि पैसा वाचला,'' अशी कृतज्ञ भावना लाभार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रशासनाच्या या गतिमान कामामुळे प्रलंबित कामे निकाली निघाल्याने शेळगाव महसूल मंडळ परिसरात समाधान व्यक्त होत आहे. एकूणच प्रशासन आपल्या दारी हा उद्देश या शिबिरामुळे यशस्वी ठरला आहे. यावेळी कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मंडळ अधिकारी पंकज पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला शेतकरी, विद्यार्थी, ग्रामस्थ आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केकर-जवळा महसूल मंडळाला जिल्ह्यात सर्वाधिक ८ कोटींचा पीकविमा

### सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; भाजप युवा मोर्चा अध्यक्ष ज्ञानेश्वर धोपटे यांची माहिती

**मानवत । प्रतिनिधी-** पीकविमा संदर्भात सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून केकर-जवळा महसूल मंडळाला परभणी जिल्ह्यात सर्वाधिक तब्बल ८ कोटी रुपयांचा पीकविमा मंजूर झाला आहे, अशी माहिती भाजपचे युवा मोर्चा अध्यक्ष ज्ञानेश्वर धोपटे यांनी दिली.

सर्कलमधील प्रत्येक पीक कापणी प्रयोगाला स्वतः उपस्थित राहून ते यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि विमा प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला, असे धोपटे यांनी सांगितले.

या यशामुळे केकर-जवळा परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून केलेल्या प्रयत्नांचे सार्थक झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. येणाऱ्या काळातही सर्वसामान्य नागरिक व शेतकरी बांधवांच्या हितासाठी अशाच प्रकारे कार्य करत राहून अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



जिंतूर-महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री आमच्या मोठ्या भगिनी आदरणीय नामदारमेघनादीदीसाकोरेबोर्डीकर यांच्या जन्मदिवसानिमित्त मा.मेघना दीदी यांच्या अवहानाला प्रतिसाद देत कुठलाही वायफळ खर्च न करता जिल्हा परिषद अध्यक्ष मा.विजयभाऊ वाकळे साहेब यांनी स्नेहालय वृद्धाश्रम येथे ज्येष्ठ वयोवृद्धांना फळ वाटप करण्यात आले याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विजय भाऊ वाकळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी दत्ताभाऊ नवले सुमेध सूर्यवंशी ,मिटकरी आप्पा, प्रतीकभैया खिल्लारे, आदर्श नाटकर, अक्षय चव्हाण व स्नेहालय वृद्धाश्रम संस्थेच्या आहिरे ताई उपस्थित होते.

## पालकमंत्री साकोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसा निमित्त जिंतूर येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष प्रतापरावजीदेशमुख,उपनगराध्यक्ष टीका खान पठाण, मोहसीन पठाण यांच्यासह नगरसेवकाची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ पंडित दराडे यांनी केले तर सूत्रसंचालन मयूर जोशी यांनी केले तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना



शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला नगराध्यक्ष प्रताप भैय्या देशमुख, गटशिक्षण अधिकारी त्र्यंबक पोले केंद्रप्रमुख एम डी घुगे,डॉ. पंडित दराडे, नगरसेवक प्रदीप चव्हाण, नगरसेवक मुन्ना कुरेशी, नगरसेवक किशोर जाधव, नगरसेवक याहिया बेग, नगरसेवक प्रदीप चौधरी राजा वैष्णव, राजेश राठोड, मोहसीन खान पठाण, , मुन्ना सर, जानिमिया तसेच शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद शहाबोद्दीन, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन उपनगराध्यक्ष टिका खान पठाण, नगरसेवक शेख अथर यांच्याकडून करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिराज सिद्दिकी, मेहरा कुरैशी यांनी विशेष परिश्रम घेतले.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. व्यवस्थापन समिती अध्यक्ष इसा चाऊस,शेख शफी सर, सय्यद रियाजुद्दीन, मनोज मुळे, कौसर आजमी बाजी, सुमेरा बाजी, सबा बाजी, आदींची उपस्थिती होती.




जिंतूर-आज आमच्या नेत्या आदरणीय सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री परभणी यांच्या वाढदिवसानिमित्त मौ वाघी धानोरा जिल्हा परिषद शाळा वाघी येथे शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेतला घार उडे आकाशी चित्त तिचे पिलापाशी या मणीप्रमाणे आमच्या भगिनी यांनी माझ्या वाढदिवसानिमित्त अतिरिक्त खर्च न करता ग्रामीण भागात जाऊन मायबाप जनतेची सेवा कराआरोग्य शिबीर घेणे,शालेय साहित्य वाटप वृक्ष लागवड केले आम्ही प्रयत्न केला या कार्यक्रमास उपस्थित माझ्यासोबत श्री कैलास खंदारे वाघी सरपंच सतीश राठोड आमचे मार्गदर्शक सुदाम अंकल गायकवाड माऊली गायकवाड, गुलाबराव गायकवाड भाऊसाहेब गायकवाड तुकाराम गायकवाड तथा उपसरपंच भागवतराव गायकवाड आदी दिसतआहेत.


## मानवतमध्ये 'राज्यमंत्री केसरी' कुस्ती स्पर्धेचा थरार

### तब्बल १६ लाखांची बक्षिसे; दंगल पाहण्यासाठी उसळणार गर्दी

**महेश दिशागत**

**मानवत ,/प्रतिनिधी:** येथील नेताजी सुभाष विद्यालयाच्या मैदानावर रविवारी (दि. १२ एप्रिल) भव्य निकाली कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित या स्पर्धेत तब्बल १६ लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली असून 'राज्यमंत्री केसरी' किताबासाठी कुस्ती शौकिनांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

या ऐतिहासिक कुस्ती मैदानात लहान गटांपासून थोरांपर्यंत अनेक नामांकित मल्लांना संधी देण्यात येणार आहे. स्पर्धेची सुरुवात २ हजार रुपयांच्या बक्षिसांपासून होणार असून मुख्य लढती लाखो रुपयांच्या बक्षिसांसाठी रंगणार आहेत. मुख्य आकर्षण असलेल्या पहिल्या क्रमांकाच्या कुस्तीसाठी ३ लाख ४५ हजार रुपये व मानाची चांदीची गदा देण्यात येणार आहे. या लढतीत सिकंदर शेख (गंगावेस तालीम) विरुद्ध अजिंक्य बनवाल (दिल्ली) आमनेसामने येणार आहेत. तसेच भारत मदने विरुद्ध विठ्ठल गणेश जगताप २ लाख ४५ हजार रुपये व चांदीची गदा, प्रमोद शिंदे विरुद्ध रोहन जगताप १ लाख ४५ हजार रुपये व चांदीची गदा, भैरवनाथ जोगी विरुद्ध निखिल पहलवान १ लाख २५ हजार रुपये, राहुल मुटे विरुद्ध महेश सोनवणे १ लाख २५ हजार रुपये, धर्मा शिंदे विरुद्ध गिरीराज दुबे १ लाख १५ हजार रुपये, सोनाली मंडलिक विरुद्ध विशाल चव्हाण १ लाख ४५ हजार रुपये, अशा अनेक रंगतदार कुस्त्या प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते होणार असून विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सायंकाळी ४ वाजल्यापासून कुस्ती दंगलींना प्रारंभ होणार आहे. कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकः- संतोष दादा गडदे पैलवान सुनील गडदे यांच्या वतीने करण्यात आले आहे



## संक्षिप्त वृत्त...

### हायवा अपघातात एक ठार तर एक जखमी



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** निष्काळजीपणाने हायवा टिप्पर चालवून एका महिलेला ठार केल्या प्रकरणी हायवा चालक याचे विरोधात सोनपेठ पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोनपेठ नगर परिषदेच्या सफाई कामगार बुधवारी सकाळी शहरातील सिरसाळा रोडलगत साफसफाईचे काम करत असताना अचानक आलेल्या हायवा टिप्पर ने दोन महिलांना चिरडले त्यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला असून दुसरी गंभीर जखमी झाली आहे.मृत महिलेचे नांव तुळसाबाई पांडूळे (वय ४५) असे असून जखमी महिलेचे नाव धुर्पताबाई वाघमारे आहे.जखमी महिलेवर दवाखान्यात उपचार सुरू आहेत. अपघात झालेल्या हायवा टिप्पर चा क्रमांक एम एच १२ एफसी ७४५९ असून हायवा मालकाचे नांव गणेश जोशी तर चालकाचे नाव विठ्ठल मुंडे आहे.या प्रकरणी सोनपेठ पोलीसात हायवा चालकाचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास सोनपेठ पोलीस करत आहेत.सदर दुर्दैवी घटनेनंतर सोनपेठ शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### मतदारांचे आभार मी मानतो- सांगळे



**जिंतूर,/प्रतिनिधी-**सावंगी माळसा पंचायत समिती सदस्य भाजपाचे धर्मपाल प्रधान यांचा श्री भगवान बाबा विद्यालयात विद्या विद्यालयाचे संस्थापक तथा भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉक्टर गुलाबराव त्रिंबकराव सांगळे नाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉक्टर सांगळे म्हणाले की १९९५ मध्ये सावंगी माळसा जिल्हा परिषद सर्कल मधून मी भाजपचा उमेदवार होतो त्यावेळेस महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. गोपीनाथराव मुंडे माझ्या प्रचारासाठी आले होते व सावंगी माळसा मधून सभा झाली होती सर्कलमध्ये व तालुक्यामध्ये भाजपचे कमळ पहिल्यांदा मी आणले होते आज माझे व मुंडे साहेबांचे स्वप्न पूर्ण झाले आहे भारतीय जनता पार्टीचा सावंगी माळसा जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार लताबाई विजयराव वाकळे ह्या निवडून आल्या व जिल्हा परिषद च्या अध्यक्ष झाल्या आज रोजी केहाळ ग्रामपंचायत च्या सरपंच गंगुबाई घंदारे ह्या भाजपच्या पंचायत समिती सदस्य धर्मपाल प्रधान भाजपाचे जिल्हा परिषद सदस्य भाजपच्या पंचायत समिती सभापती भाजपचा जिंतूरच्या आमदार भाजपा, जिल्हा परिषद अध्यक्ष भाजपा आणि परभणीच्या पालकमंत्री भारतीय जनता पार्टीच्या झालेल्या आहेत मुंडे साहेबांचे व आमचे स्वप्न आज रोजी पूर्ण झालेले आहे त्याबद्दल जिंतूर तालुक्यातील मतदारांचे आभार असे डॉक्टर सांगळे म्हणाले

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमानिमित्त

'क्रांतीचा साक्षीदार' नाटक, भिमगीत, पोवाडयांचे कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा अंतर्गत सामाजिक समता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात ''क्रांतीचा साक्षीदार'' हे एकपात्री नाटक रुपेश निकाळजे सादर करणार आहेत. दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ७.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ ''भिम-बौध्द गितांचा जलसा'' हा कार्यक्रम प्रा. प्रिती भालेराव व संच सादर करणार आहेत. तर सकाळी ९.०० वा. शाहिर काशिनाथ उबाळे व संच भिमगीत व पोवाडे गायनाचा कार्यक्रम सादर करणार आहेत. तरी या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे.

### जनगणना २०२७ : स्व-गणना सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन

**परभणी, /प्रतिनिधी-** जनगणना -२०२७ ची प्रक्रिया सुरु झाली आहे. ही जनगणना विशेष उल्लेखनीय आहे, कारण ही भारतातील पहिली जनगणना असेल ज्यामध्ये माहिती संकलन डिजिटल साधनांव्दारे केले जाणार आहे.

जनगणना २०२७ साठी पहिल्यांदाच कुटुंबाकरीता स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध असेल. ही सुविधा दि. १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. यावर नागरिकांना स्वत:ची माहिती ऑनलाईन भरता येणार आहे. ही सुविधा सुरक्षित, सुलभ व सोयीस्कर आहे. या सुविधाचा लाभ नागरिकांनी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे. स्व गणन म्हणजे काय स्व-गणना हा एक नाविण्यपूर्ण आणि सोयीस्कर पर्याय आहे, जो कोणत्याही सामान्य कुटुंबातील नागरिकाला त्यांच्या सोयीनुसार घरातून / कार्यालयातून किंवा इतर कुठूनही सुरक्षित वेब पोर्टल वापरुन त्यांच्या कुटुंबाची माहिती ऑनलाईन भरण्याची मुभा देतो. अधिक, आधुनिक, कार्यक्षम आणि समावेशक माहिती संकलन प्रक्रियेच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

### ऑपरेशन यात्री सुरक्षा'अंतर्गत मोठी कारवाई; लाखो रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त : दोन सराईत आरोपींना अटक

**परभणी,/प्रतिनिधी :** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' मोहिमेअंतर्गत रेल्वे संरक्षण बल (आरपीएफ) नांदेड व लोहमार्ग पोलीस नांदेड यांच्या संयुक्त पथकाने महत्त्वपूर्ण कारवाई करत चेन स्नॅचिंगसह चार प्रकरणांतील चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहे. १ एप्रिल २०२६ रोजी संयुक्त पथकाने प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करणाऱ्या दोन सराईत आरोपींना अटक केली. तपासादरम्यान या आरोपींचा संबंध लोहमार्ग पोलीस ठाणे नांदेड येथे २६ फेब्रुवारी २०२६ रोजी नोंदविण्यात आलेल्या उच्च मूल्याच्या चेन स्नॅचिंग प्रकरणाशी असल्याचे निष्पन्न झाले. या संयुक्त कारवाईतून विविध प्रकरणांतील लाखो रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. दि. ८ एप्रिल २०२६ रोजी आरोपीस पोलीस कोठडीनंतर माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालय, नांदेड येथे हजर करण्यात आले असून, रेल्वे प्रशासनाने 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' मोहिमेअंतर्गत प्रवाशांच्या सुरक्षेसाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## अग्रलेख...

# नि:श्वास की रोखलेला श्वास?

काही मुठी झाकलेल्या असतात तोवर त्यांच्या शक्तीच्या काल्पनिक भयाने अनेक जण थरकापून राहतात. पण दर्पोक्तीच्या फुत्कारांचे फवारे आदळून मूठ सैल होत गेली की आवळलेल्या मुठीमध्ये काहीच नाही, याची जगाला जाणीव होते आणि दर्पोक्तीचे हसे होते. आपल्या दुसऱ्या सत्ताकाळात, सन २०२५ पासून अमेरिकेला सर्वोच्च स्थानावर राखण्याचे सारे श्रेय स्वतःकडे ठेवण्याच्या हट्टापायी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या कारकीर्दीत जेव्हा जेव्हा कोलांटउड्या मारल्या, तेव्हा तेव्हा ती झाकली मूठ उघडी होत गेली आणि ट्रम्प यांच्यावरील हेकेखोरीचा शिक्का ठळक होत गेला. जगात शांतता नांदावी यासाठी आपण अथक परिश्रम घेत असल्याचे भासविण्यामागेही, शांततेचे नोबेल पारितोषिक मिळविणे हाच हेतू असल्याचा अनेकांचा दावा पुढे त्यांच्या प्रत्येक कृतीनंतर सबळ होत गेला आणि ट्रम्प यांची झाकली मूठ उघडी पडत गेली. गेल्या वर्षभरात ट्रम्प यांनी शांतता करार घडविल्याचे आणि युद्धे थांबविण्याचे अनेक दावे केले, त्यामागेही शांततेचे नोबेल मिळविण्याची त्यांची धडपड होती हे स्पष्ट झाले. आपण सहा ते नऊ युद्धे संपविली आणि शांतता प्रस्थापित केली, अशी दर्पोक्ती करीत जगाच्या कल्याणासाठी आपला जन्म झाला असल्याचा व आपण सर्वशक्तिमान असल्याचा आभास निर्माण करणाऱ्या या नेत्याच्या कार्यशैलीमुळे जगाच्या नजरेसमोर असलेली 'शक्तिमान राष्ट्र' ही अमेरिकेची प्रतिमा आता संकटात सापडली असून शांतिदूत म्हणून मिरविण्याच्या धडपडीतून ट्रम्प यांच्यावर युद्धखोरीचा ठपका बसण्याच्या शक्यतेमुळे अमेरिकेच्या प्रतिष्ठेलाही धक्का बसला आहे.

२०२५ मध्ये नोबेल पुरस्कार मिळविण्याचे सारे प्रयत्न फोल ठरल्यानंतर २०२६ मध्ये तरी या पुरस्काराचे दावेदार ठरावे यासाठी गाझा संघर्षविरामाचे आणि अन्य राजनैतिक यशाचे पाढे स्वमुखाने वाचणाऱ्या ट्रम्प यांच्या कारकीर्दीला इराणविरुद्धच्या युद्धातील अविचारी हिंसाचाराची काजळी लागल्यामुळे जी काही नामुष्की झाली आहे, त्यातून सावरण्यासाठी व झाकली मूठ ताकदवान असल्याची जाणीव जगाला पुन्हा करून देण्यासाठी अमेरिकेला काही दशकांचा भविष्यकाळ कामी लावावा लागणार आहे. केवळ काही दिवसांत इराणची खामेनेई सत्ता उलथून टाकू आणि तेथील जनतेला अपेक्षित असलेली सत्ता प्रस्थापित करून देऊ, अशी दर्पोक्ती करीत तब्बल ४० दिवस इराणच्या विध्वंसाकरिता इरेस पेटून सारी ताकद पणाला लावलेल्या ट्रम्प यांच्या हेकेखोरीमुळे उद्‌भवलेल्या आर्थिक अस्थिरतेमुळे अवघ्या जगाने भविष्यभयाने आपला श्वास रोखून धरला होता. इराणची संपूर्ण संस्कृती इतिहासजमा करून इराणला पुन्हा अश्मयुगात धाडण्याचा अविवेकी इशारा देत आपल्या युद्धपिपासेचे विकृत दर्शन घडविणाऱ्या दर्पोक्तीच्या अंमलबजावणीच्या अखेरच्या क्षणी मात्र अचानक माघार घेत शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांचे श्रेय स्वतःच्या नावे जमा करण्याचा ट्रम्प यांचा नवा प्रयत्न म्हणूनच युद्धबंदीच्या या हतबल निर्णयाची नोंद घ्यावी लागेल. इराणची संस्कृती नष्ट करण्याचा इशारा देऊन त्यासाठी दिलेल्या मुदतीचा अंतिम क्षण नजीक येण्याच्या जेमतेम ९० मिनिटे अगोदर ट्रम्प यांनी पाकिस्तानला पुढे करून मांडला गेलेला युद्धबंदी प्रस्ताव मान्य केला आणि हजारोंचे बळी घेणारे हे युद्ध तात्पुरत्या स्वरूपात तरी थांबल्याच्या जाणिवेने जगाने नि:श्वास सोडला. पुढच्या दोन आठवड्यांत होऊ घातलेल्या वाटाघाटी आणि करारादी राजनैतिक औपचारिकतेतून जे काही निष्पन्न होईल, त्यावर या युद्धाचेच नव्हे, तर ट्रम्प यांच्या प्रतिमेचे आणि अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाचेही भवितव्य ठरणार असल्याची धाकधूक मात्र अजूनही संपलेली नाही. कारण युद्धबंदीचा प्रस्ताव उभय बाजूंनी स्वीकारल्यानंतर काही तासांतच पुन्हा इस्रायलने लेबनॉनवर भीषण हल्ला केल्याने मध्यपूर्वेतील युद्धाचे ढग अजूनही कायमच आहेत. बुधवारी इस्रायलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यांचे रूप आतापर्यंतच्या संघर्षातील सर्वात भीषण होते. यामध्ये शेकडो निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून इराणने पुन्हा युद्धाचा इशारा जारी केला आहे. त्यामुळे युद्धबंदीचा हा निर्णय टिकणार की केवळ फार्स ठरणार, याकडे लक्ष लागलेल्या जगाचा श्वास पुन्हा एकदा रोखला गेला आहे. अमेरिकेसोबत शांतता करार करण्याबाबत वाटाघाटी होणार किंवा नाही, यावरच विचार करण्याची वेळ आल्याचा इशारा या हल्ल्यानंतर इराणने दिल्यानंतर, अमेरिका मात्र वाटाघाटींसाठी आग्रही असल्याचे जे चित्र रंगविले जात आहे, ते पाहता, अमेरिकेस या युद्धस्थितीतून बाहेर पडणे अपरिहार्य असल्याचेही स्पष्ट होऊ लागले आहे.

या अपरिहार्यतेची अनेक कारणे आहेत. पहिले म्हणजे, खामेनेई या इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या मृत्यूनंतर अमेरिकेस अपेक्षित सत्तापालट घडवून आणणे शक्य झालेले नाहीच; उलट या हत्येमुळे इराणची प्रतिशोधाची ऊर्मी अधिक उफाळल्याने अमेरिकेच्या प्रत्येक हल्ल्यास जोरदार प्रत्युत्तर देत इराणने अमेरिकेस जेरीस आणले. ट्रम्प यांच्या दर्पोक्तीपुढे गुडघे न टेकता प्रत्येक आव्हानाचे उत्तर देण्याचा इराणचा निर्धार अखेरच्या क्षणापर्यंत अमेरिकी सैन्याचे मनोबल खच्ची करत होता आणि लक्षावधी डॉलर्सच्या युद्धसामग्रीचा पुरता विध्वंस झाल्याने अमेरिकेची युद्धक्षमताही खिळखिळी झाली होती. अमेरिका जेवढा काळ मैदानात असेल, तेवढ्या काळापर्यंत चिवट लढा देण्याचा इरादा वारंवार स्पष्ट करून इराणने अमेरिकेसमोर न झुकण्याचा घेतलेला पवित्रा हा अमेरिकेच्या सहज विजयाच्या स्वप्नरंजनास जबर धक्का देणारा ठरल्याने तेथील नागरिकांमध्येही ट्रम्प यांच्या हेकेखोर युद्धखोरीविषयी नाराजीचे स्पष्ट संगरूर उमटू लागले होते. इस्रायलचे बोट धरून ट्रम्प यांनी अमेरिकेस युद्धाच्या खाईत ढकलल्याची जाणीव व्यक्त होऊ लागल्यावर ट्रम्प यांच्या प्रतिमानिर्मितीच्या स्वघोषित प्रयत्नांना उतरती कळा लागल्याचे स्पष्ट झाले. अशा वेळी पाकिस्तानच्या हतबलतेचा फायदा घेण्याचा शहाणपणा ट्रम्प प्रशासनाने वेळीच दाखविला आहे. युद्धबंदीसाठी व संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाकिस्तान पुढाकार घेत असल्याचे चित्र जगासमोर आणले गेले आणि अमेरिकेचाच युद्धबंदीचा अप्रत्यक्ष प्रस्ताव पाकिस्तानमार्फत मांडला गेला.

शस्त्रसंधीच्या या पाकिस्तानी प्रस्तावावर बुधवारी इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात मतैक्य झाले असले, तरी हा शस्त्रसंधी दोन आठवडे टिकेल, याची खात्री नाही. या मतैक्यानंतर लगेचच इस्रायलने लेबनॉनला प्रस्तावाच्या कक्षेतून वगळण्याचा पवित्रा घेत केलेल्या हल्ल्यांमुळे युद्धाचे वातावरण पुन्हा चिघळले आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाकिस्तानला पुढे करण्याच्या प्रयत्नांवरही पाणी पडले. येत्या शनिवारपासून या प्रस्तावावर पाकिस्तानात अमेरिका-इराण यांच्यात चर्चा होणार असली, तरी इस्रायलचे हल्ले आणि इराणचे प्रतिहल्ले यांच्यामुळे या शस्त्रसंधीचे गांभीर्य हरवले आहे. इराणी संस्कृती इतिहासजमा करण्याच्या धमकीनंतर इराणवर आणि जगावर विध्वंसाच्या भीतीचे सावट गडद झाले होते, पण इराणचा बाणा आणि अमेरिकेतील जनमानसाचा कल यामुळे ट्रम्प यांना माघारीचा पर्याय निवडण्यासाठी हा प्रस्ताव उपयुक्त ठरला, एवढेच या प्रस्तावाचे नेमकेपण म्हणावे लागेल. लेबनॉनमधील धुमश्चक्रीनंतर पुन्हा एकदा होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी झाली आहे. या सामुद्रधुनीवरील इराणचे वर्चस्व मोडून काढणे व इराणमध्ये सत्तापालट घडवून आणणे ट्रम्प यांच्या हेकेखोर प्रशासनास शक्य झालेले नाही. मग ४० दिवस विध्वंसक युद्ध करून, जगाला आर्थिक संकटात ढकलून आणि भावी पिढ्यांच्या भविष्यावर काजळी फेरणारी कारवाई करून ट्रम्प यांनी काय मिळविले, हा प्रश्न आता त्यांना जगभरातून विचारला जाणार आहे. या युद्धात सर्वाधिक होरपळ झालेल्या पाकिस्तानला सावरण्यासाठी त्यांच्या शांतिदूत भूमिकेचा काय फायदा होतो, हेदेखील या अशांत वातावरणाच्या अनिश्चिततेतून उघड होणार आहे. युरोपीय देशांनी या युद्धाकडे तटस्थतेने पाहिले. अशी भूमिका अंतिमतः राजनैतिकदृष्ट्या योग्य ठरली, हे येत्या दोन आठवड्यांतील घडामोडींनंतर जेव्हा जगाला पटेल, तेव्हा ट्रम्प यांच्या प्रतिमेचे भविष्य काय असेल, याचे उत्तरही सापडलेले असेल.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# नागरिक, व्यावसायिक व करदात्यांसाठी टीडीएस मार्गदर्शक; आर्थिक वर्ष २०२५-२६ व २०२६-२७

भारताची करप्रणाली अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने स्रोतावर कर कपात (टीडीएस) ही प्रणाली अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पूर्वी टीडीएस हा केवळ कंपन्या किंवा मोठ्या व्यवसायांपुरता मर्यादित आहे, असा सर्वसामान्य समज होता; मात्र आजच्या काळात तो प्रत्येक आर्थिक व्यवहाराचा अविभाज्य भाग बनला आहे. आता सामान्य व्यक्ती किंवा एच.यू.एफ.सुद्धा अनेक व्यवहारांमध्ये टी.डी.एस. कापण्यास बांधील आहेत. त्यामुळे प्रत्येक करदात्याने टी.डी.एस.चे नियम, त्याची अंमलबजावणी आणि त्याचे परिणाम समजून घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

टी.डी.एस. म्हणजे एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला पैसे देताना त्या रकमेवर ठरावीक दराने कर कपात करून तो थेट सरकारकडे जमा करणे. ही प्रणाली कर संकलनाची आगाऊ पद्धत आहे, ज्यामुळे सरकारला वेळेवर महसूल मिळतो आणि करचुकवेगिरी कमी होते. टी.डी.एस. लागू होणारे घटक पाहता कंपन्या, पार्टनरशिप फर्म, एलएलपी तसेच ठरावीक टर्न ओव्हर मर्यादा ओलांडणारे प्रोप्रायटर्स यांना तर टी.डी.एस. कापणे बंधनकारक आहेच; परंतु सामान्य व्यक्तीलाही काही विशिष्ट व्यवहारांमध्ये टी.डी.एस. लागू होतो. उदाहरणार्थ, रु. ५०,००० पेक्षा जास्त मासिक घरभाडे देताना, रु. ५० लाखांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता खरेदी करताना किंवा कंत्राटदार/व्यावसायिकाला मोठे पेमेंट करताना टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे. अनेकदा व्यक्ती या नियमांकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे पुढे आयकर विभागाकडून नोटीस, व्याज आणि दंडाचा सामना करावा लागतो.

व्यक्तींसाठी विशेष महत्त्वाचे टी.डी.एस. नियम समजून घेतले तर घरभाड्यावर लागू होणारा टी.डी.एस. हा अत्यंत महत्त्वाचा आहे. कलम १९४ आयबी (नवीन ३९३आयबी) नुसार, जर एखाद्या व्यक्तीने दरमहा रु. ५०,००० पेक्षा जास्त भाडे दिले, तर त्यावर ५ टक्के टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे. येथे विशेष बाब म्हणजे, व्यवसाय नसलेल्या व्यक्तीलाही हा नियम लागू होतो आणि टी.ए.एन. घेण्याची आवश्यकता नसते. वर्षातून एकदाच टी.डी.एस. कापून जमा करता येतो. त्याचप्रमाणे, मालमत्ता खरेदी करताना (कलम १९४ आयए/नवीन ३९३ आयए) जर मालमत्तेची किंमत रु. ५० लाखांपेक्षा जास्त असेल, तर १ टक्का टी.डी.एस. कापणे बंधनकारक आहे. हा नियम प्रत्येक खरेदीदाराला लागू आहे, जरी तो पहिल्यांदाच घर घेत असला तरी. तसेच, कंत्राटदार किंवा व्यावसायिकाला वर्षात रु. ५० लाखांपेक्षा जास्त पेमेंट केल्यास (कलम १९४ एम/नवीन ३९३ एम) २ टक्के टी.डी.एस.




कापावा लागतो.

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी विविध व्यवहारांवर टी.डी.एस. चे दर निश्चित करण्यात आले आहेत. पगारावर टी.डी.एस. हा स्लॅबनुसार लागू होतो, तर बँक व्याजावर १० टक्के, कंत्राटावर १ टक्का किंवा २ टक्के, प्रोफेशनल फीवर १० टक्के, व्यावसायिक भाड्यावर १० टक्के, व्यक्तींकडून दिल्या जाणाऱ्या उच्च भाड्यावर ५ टक्के, मालमत्ता खरेदीवर टक्का आणि मोठ्या पेमेंटवर २ टक्के टी.डी.एस. लागू होतो. याशिवाय, एक अत्यंत महत्त्वाचा बदल म्हणजे १ एप्रिल २०२५ पासून लागू झालेला कलम १९४ टी (नवीन ३९३ टी). या तरतुदीनुसार, पार्टनरशिप फर्मने आपल्या पार्टनरला दिलेल्या वेतन, कमिशन, बोनस किंवा व्याजावर १० टक्के टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे. जर एकूण रक्कम रु. २०,००० पेक्षा जास्त असेल. हा बदल विशेषतः लहान आणि मध्यम फर्मसाठी महत्त्वाचा आहे. कारण अनेकांना अजूनही याची पूर्ण माहिती नाही. वर्षाच्या शेवटी टी.डी.एस.चे पालन (वर्षाअखेरीस अनुपालन) करणे अत्यंत आवश्यक आहे. ३१ मार्चपर्यंत सर्व संबंधित खर्चांवर टी.डी.एस. कापणे बंधनकारक आहे तर ३० एप्रिलपर्यंत तो सरकारकडे जमा करणे आवश्यक आहे. यामध्ये ऑडिट फी, प्रोफेशनल फी, कंत्राट खर्च, कमिशन, भाडे, व्याज तसेच पार्टनरचे वेतन यांचा समावेश होतो. विशेष लक्षात ठेवण्याची बाब म्हणजे, जरी प्रत्यक्ष पैसे दिले नसले, तरी फक्त तरतूद केल्यावरही टी.डी.एस. कापणे आवश्यक असते. जर टी.डी.एस. नियमांचे पालन केले नाही तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. संबंधित खर्च आयकर गणनेत नकार होतो, ज्यामुळे करदायित्व वाढते. तसेच, टी.डी.एस. न कापल्यास दरमहा १ टक्का आणि कापूनही जमा न केल्यास १.५ टक्के व्याज लागू होते. याशिवाय दंड आणि कायदेशीर कारवाईची शक्यतादेखील असते. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे विभाग क्रमांक मध्ये बदल, ज्यामध्ये १९४ मालिकेतील सर्व कलमे आता ३९३ मालिकेत रूपांतरित करण्यात आली आहेत (उदा. १९४ सी? ३९३ सी, १९४ जे? ३९३ जे, १९४ आयबी? ३९३ आयबी). त्यामुळे करदात्यांनी नवीन सेक्शन नंबर समजून घेणे अत्यावश्यक आहे. याशिवाय आर्थिक वर्ष आणि मूल्यांकन वर्ष ऐवजी 'कर वर्ष' ही संकल्पना लागू करण्यात येत आहे तसेच संपूर्ण प्रणाली अधिक सुलभ आणि डिजिटल करण्यात आली आहे, ज्यामुळे ए.आय.एस. आणि फॉर्म २६ एएस अधिक प्रभावी झाले आहेत. या बदलांमुळे भाडे व्यवहार, मालमत्ता व्यवहार आणि इतर आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक होणार असून करचुकवेगिरी करणे कठीण होणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी काही महत्त्वाच्या सूचना म्हणजे, भाडेकरूंनी रु. ५०,००० पेक्षा जास्त भाडे असल्यास टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे, तर मालकांनी टी.डी.एस. कापला आहे का, हे तपासून आय.टी.आर.मध्ये त्याचा क्रेडिट घ्यावा. घर खरेदी करणाऱ्यांनी रु. ५० लाखांपेक्षा जास्त व्यवहारात १ टक्का टी.डी.एस. कापणे विसरू नये. तसेच व्यवसाय करणाऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी सर्व टी.डी.एस. तपासून ३० एप्रिलपूर्वी तो जमा करणे अत्यावश्यक आहे. आजच्या काळात टी.डी.एस. हा केवळ व्यवसायापुरता मर्यादित राहिलेला नसून प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक व्यवहाराचा महत्त्वाचा भाग बनला आहे. रु. ५०,००० पेक्षा जास्त भाडे, रु. ५० लाखांपेक्षा जास्त मालमत्ता व्यवहार, वर्षअखेरीचे टी.डी.एस. पालन आणि नवीन सेक्शन नंबर यांची योग्य माहिती असणे अत्यावश्यक आहे. योग्य प्रकारे टी.डी.एस. पालन केल्यास आपण केवळ दंड वाचवत नाही, तर आपल्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता, विश्वासार्हता आणि कायदेशीर सुरक्षितता सुनिश्चित करतो.

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# पुणे तिथे काय उणे... बघा वाढताहेत गुन्हे!

महाराष्ट्रात झपाट्याने वाढणाऱ्या सायबर फसवणुकीच्या घटना समाजाच्या प्रत्येक स्तराला स्पर्श करीत आहेत. शेअर ट्रेडिंगमध्ये प्रचंड नफा, कमी कालावधीत पैसे दुप्पट, इनसाईड टिप्स अशा गोडबोल्यांनी लोकांना जाळ्यात ओढणाऱ्या टोळ्या आता अधिक संघटित, चलाख व निर्दयी झाल्याचे पावलोपावली जाणवू लागले आहे. पुण्यासारख्या शिक्षणनगरीत, जिथे जागरूकता आणि 'आयटी हब'मध्ये तिथेच दोन-सव्वादोन वर्षात साडेचारशे कोटी रुपयांची फसवणूक होणे धक्कादायक आहे. मोबाईलवर आलेला एक कॉल, व्हॉट्सॲपवर आलेला एक मेसेज किंवा सोशल मीडियावर दिसलेली एक जाहिरात यातून लोकांच्या आयुष्यभराच्या बचतीवर डल्ला मारला जातो; नव्हे बरेचदा आपण स्वत:च तो फास स्वत:च्या गळ्यात टाकून घेतो. पुण्यात २०२४ मध्ये १९७ कोटी ६१ लाख, २०२५ मध्ये १६२ कोटी १९ लाख तर २०२६ मध्ये अवघ्या ४ महिन्यात ९२ कोटी २२ लाख असे ९८२ घटनांमध्ये साडेचारशे कोटींची फसवणूक झाल्याचे पुढे आले आहे. या व्यतिरिक्त पुण्यातील काही लोकांनी आपली फसवणूक झाली, यातून बदनामी होईल या भीतीपोटी तक्रारी दाखल केल्या नसतील. त्यांची संख्याही मोठी असण्याची शक्यता आहे. या सायबर अटॅकमध्ये शिक्षित, व्यावसायिक, निवृत्त व्यक्ती सर्वच वर्गातील लोक अडकले जातात. 'डिजिटल इंडिया'च्या युगात डिजिटल फसवणूकही तितक्याच वेगाने वाढते आहे, हे या निमित्ताने पुढे येत आहे. फसवणूक होत असल्याची जनजागृती केली जात असतानाही पुण्यासारख्या बुद्धिजीवींचे पैसे एका क्लीकमध्ये उडवण्याची शक्कल असलेले चोरटे किती हुशार असतील? विशेष म्हणजे कोणालाही ओटीपी देऊ नका, एटीएमची पिन कोणाला सांगू नका, असे आवाहन करीत असतानाही आपण फक्त आणि फक्त दुप्पटच्या मोहात अडकले जात आहोत. हा प्रताप केवळ पुण्यातच होतो आहे, असे अजिबात नाही. राज्यातच नव्हे, तर देशात 'विश्वास' देणाऱ्यांपेक्षा 'विश्वासघात' करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे. अशा घटना राज्यात, देशात होऊ लागल्या आहेत. मात्र, घडणाऱ्या गुन्ह्यांच्या तुलनेत गुन्हेगार उघड होण्याची टक्केवारी नाममात्र आहे. त्यामुळे 'दुप्पट' पैसा करून देणाऱ्यांची संख्या 'दुप्पट'च्या वर गेली आहे. पुण्यात बुद्धी आणि पैशांनाही कमी नाही. हडपसर परिसरात वृद्ध 'डॉक्टर'ला कमी कालावधीत भरघोस परतावा देण्याचे आमिष दाखवून तब्बल १२ कोटी ३१ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. समाजात उच्चशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम मानल्या जाणाऱ्यांचीही यातून सुटका नाही. नव्हे, या जाळ्यात अडकणाऱ्यांमध्ये त्यांचीच संख्या आहे. लवकर श्रीमंत होण्याची इच्छा, इतरांपेक्षा पुढे जाण्याची घाई, मोठ्या परताव्याची लालसा □याचा गैरफायदा घेत चोरटे डल्ला मारत आहेत. बनावट प्रोफाईल तयार करून, खोटे स्क्रीनशॉट्स दाखवून, बनावट वेबसाईट्स तयार करून विश्वास निर्माण केला जातो. 'कस्टमर केअर'च्या नावाखाली संपर्क करून लोकांची वैयक्तिक माहिती घेतली जाते. काही ठिकाणी शेतकऱ्यांना शेतीसंबंधित गुंतवणुकीच्या नावाखाली फसवले जाते तर काही ठिकाणी तरुणांकडून नोकरीच्या नावाखाली पैसे उकळले जातात. शहरांमध्ये शेअर मार्केट आणि क्रिप्टोकरन्सीच्या नावाखाली लोकांना लुबाडणूक होण्याची संख्या वाढत चालली आहे. या पृष्ठभूमीवर पोलिस यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. कमी वेळात जास्त नफा फसवणुकीशिवाय मिळूच शकत नाही, हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट असतानाही आम्ही मात्र दुप्पटच्या मागे लागतो आणि लाखोची रक्कम हरवून बसतो. एखाद्या गरजूला (अडचणीत असलेल्या नातेवाईकांना) आर्थिक मदत देताना हजारदा विचार केला जातो. मात्र, कमी वेळात जास्त नफा मिळविण्याच्या नादात एका मिनिटात करोडे रुपये उडवले जातात. तंत्रज्ञान जितक्या वेगाने पुढे जात आहे, तेवढ्याच वेगाने फसवणुकीची नवनवीन शक्कलही लढवली जात आहे. आयते खाण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. या गुन्ह्यांमध्ये तरुणांचाच नव्हे, तर तरुणींचाही समावेश वाढतो आहे. राजस्थानातील एका मुलीने चक्क एका युवकाला प्रेमपाशात अडकवण्याचा प्रयत्न करून त्याची आर्थिक बाजू समजावून घेतल्याचा प्रकार गेल्या ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये घडला. महिंद्रा कोटक नावाच्या एका फ्रॉड कंपनीने तर शेअर बाजारात टाकण्यासाठी स्वत: काही रक्कमही देण्याचा प्रकार घडला होता. या लोभात अनेक वर्धेकर अडकले आहेत. पावलोपावली फसगतीचा प्रकार घडत असतानाही आपण बेसावध का? फक्त पैशांसाठीच ना! पुणेकरांचाच विचार केल्यास 'पुणेकर गुंतले, ठग फक्त हसले' ही अजून एक नवीन म्हण प्रचलित होऊ नये म्हणजे झाले.

९८८१९०३७६५

## विशेष

**डॉ. संजय तांबे**


# होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमन

एप्रिल १७५५ हा दिवस मानवजातीच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. कारण याच दिवशी जर्मनीमधील मैसेन या गावात वैद्यकीय क्षेत्रातील एका क्रांतिकारी युगपुरुषाचा जन्म झाला. डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांनी होमिओपॅथी या नैसर्गिक, शास्त्रीय व मानवतावादी उपचार पद्धतीचा शोध लावून संपूर्ण जगाला एक अनमोल देणगी दिली. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत, अपार कष्ट, अचाट बुद्धिमत्ता, ज्ञानलालसा आणि योग्य तेच स्वीकारण्याची दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी मानवाला एक सुरक्षित व प्रभावी उपचार पद्धती प्रदान केली.

डॉ. हॅनेमन यांचे वडील चिनीमातीच्या भांड्यांचे रंगारी होते. घरची परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे त्यांना वयाच्या १२ व्या वर्षी प्रथम शाळेत जाण्याची संधी मिळाली. लहानपणापासूनच त्यांना गणित, भाषा व वनस्पतिशास्त्र यांची विशेष आवड होती. वयाच्या २० व्या वर्षी त्यांनी वैद्यकीय शिक्षणास सुरुवात केली आणि 'कमवा व शिका' या तत्त्वावर त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. वयाच्या २४ व्या वर्षी एम.डी. पदवी संपादन करून त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.

सुमारे १२ वर्षांच्या ॲलोपॅथिक व्यवसायानंतर त्यांना त्या काळातील अमानुष उपचार पद्धतींबद्दल वैफल्य वाटू लागले. रुग्णांना उपाशी ठेवणे, फटके मारणे, बांधून ठेवणे अशा पद्धती त्यांना मान्य नव्हत्या. त्यांनी या पद्धतींचा विरोध करून रुग्णांना सुसह्य उपचार मिळावेत यासाठी जर्मन सरकारकडे तक्रार केली. 'सर्वच रुग्ण वेडे नसतात, ते फक्त मानसिकदृष्ट्या आजारी असतात-' ही मानवी दृष्टिकोनाची संकल्पना त्यांनी सर्वप्रथम मांडली.

कुलन यांच्या 'मटेरिया मेडिका' या पुस्तकाचे भाषांतर करीत असताना त्यांना सिंकोना या वनस्पतीबद्दल माहिती मिळाली की, तिचा अर्क मलेरिया बरा करतो. याबद्दल संशय आल्याने त्यांनी स्वतःवर प्रयोग केला. काही दिवसांनी त्यांना मलेरियासारखी लक्षणे दिसू लागली. या अनुभवातून त्यांनी सखोल संशोधन करून एक महान सिद्धांत मांडला- 'जो पदार्थ निरोगी माणसात रोग निर्माण करू शकतो, तोच पदार्थ अशा प्रकारचा रोग असलेल्या रुग्णाला बरा करू शकतो.' यालाच 'समः समं शमयाति' किंवा 'जशास तसे' हा सिद्धांत म्हणतात. याच सिद्धांतातून होमिओपॅथी शास्त्राचा जन्म झाला.



डॉ. हॅनेमन यांनी आपल्या आयुष्यभर अथक परिश्रम करून ऑर्गनॉन, मटेरिया मेडिका आणि रिपर्टरी यांसारखे मौल्यवान ग्रंथ निर्माण केले. त्यांनी रोग, उपचार, आरोग्य आणि चेतनाशक्ती यांचा सखोल अभ्यास करून संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात नवा दृष्टिकोन दिला. त्यांनी असा तर्क मांडला की, कॉलरासारखे साथीचे रोग सूक्ष्म जिवांमुळे होतात. त्या काळी सूक्ष्मदर्शक (मायक्रोस्कोप) उपलब्ध नव्हता; परंतु नंतर मायक्रोस्कोपच्या शोधानंतर त्यांचा तर्क अचूक ठरला. त्यामुळे त्यांना एक निरीक्षणक्षम वैज्ञानिक, तत्त्वज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, वनस्पतिशास्त्रज्ञ आणि भाषातज्ज्ञ अशा अनेक पदव्या देता येतात.

### भारत आणि होमिओपॅथी

भारतामध्ये सन १८३९ मध्ये होमिओपॅथीचा प्रवेश झाला. पंजाबचे महाराजा रणजितसिंह यांना झालेल्या आजारावर यशस्वी उपचार केल्यानंतर ही उपचार पद्धती भारतात लोकप्रिय झाली. सन १९३६ मध्ये सरकारमान्यता प्रक्रियेला सुरुवात झाली आणि १९५८ मध्ये विविध राज्यांमध्ये होमिओपॅथीला अधिकृत मान्यता मिळाली. आज भारतात जवळपास दोन लाखांहून अधिक होमिओपॅथिक चिकित्सक कार्यरत आहेत. महान कवी रवींद्रनाथ टागोर यांनी होमिओपॅथीला शास्त्रीयदृष्ट्या मान्यता दिली होती, तर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी असे म्हटले आहे की, 'आरोग्यसेवेत होमिओपॅथीच भारतासारख्या गरीब व विकसनशील देशाला तारू शकते.'

### होमिओपॅथीचे प्रमुख फायदे

१. शरीर, मन व व्यक्तीच्या एकत्रित अभ्यासावर आधारित उपचार पद्धती.
२. आवश्यक तेवढ्याच तपासण्या व कमी खर्चिक औषधे.
३. औषधांचे व्यसन लागत नाही.
४. औषधे घेणे सोपे व चवीस रुचकर.
५. अत्यंत सुरक्षित व दुष्परिणामविरहित उपचार.
६. सर्व वयोगटातील रुग्णांसाठी उपयुक्त.
७. तीव्र, जुनाट व साथीच्या रोगांवर प्रभावी उपचार.
८. अनेक वेळा शस्त्रक्रिया टाळता येऊ शकते.
९. कुटुंब वैद्य (फॅमिली डॉक्टर) संकल्पना प्रत्यक्षात वापरली जाते.
१०. रुग्णाची प्रतिकारशक्ती वाढवून त्याला निसर्गाच्या जवळ नेते.

अशा या लोकविलक्षण, महान व मानवतावादी व्यक्तिमत्त्वाने जगाला दिलेली 'होमिओपॅथी' ही समाजोपयोगी उपचार प्रणाली आजही लाखो रुग्णांना आरोग्य व आशा देत आहे. अशा या होमिओपॅथीचे जनक ठरलेल्या डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांना आज त्यांच्या २७१ व्या जयंतीनिमित्त शतशः प्रणाम.

(लेखक होमिओपॅथिक मेडिकल असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आहेत.)

## वाचक पत्रे

### सुरक्षित मातृत्व : प्रत्येक महिलेचा अधिकार

महिलांच्या सर्वांगीण विकासासोबतच सुरक्षित मातृत्व यासाठी प्रधानमंत्री मातृवंदन योजना लोकप्रिय होत आहे. गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासोबतच काम करणाऱ्या महिलांना वेतनातील नुकसान भरपाई मिळत असल्यामुळे राज्यात सुमारे ५ लाख ७० हजारांपेक्षा जास्त महिलांनी नोंदणी केली आहे. या योजनेमुळे मातामृत्यू तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. नागपूर विभागात चांगला प्रतिसाद असून जिल्ह्यात १८ हजार २६२ महिलांनी नोंदणी केली आहे. या माध्यमातून गरोदर माता आणि बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी लाभार्थीला आर्थिक मदत देण्यात येत आहे. पहिल्या मुलाच्या जन्माच्या वेळी ५ हजार रुपये तसेच दुसऱ्या मुलीच्या जन्माच्या वेळी ६ हजार रुपये थेट बँक खात्यात जमा करण्यात येतात. केंद्र शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागामार्फत मातृवंदन योजना राज्यात राबविण्यात येत आहे. गर्भवती मातेला दैनंदिन मजुरी करावी लागू नये तसेच मजुरीमुळे होणारे आर्थिक नुकसान भरपाई देण्यासाठी या योजनेत तरतूद करण्यात आली आहे. त्यासोबतच दवाखान्यात प्रसूती आणि बालकांचे वेळेवर लसीकरण होत आहे. या योजनेसाठी लाभार्थी मातेचे आधार कार्ड आणि बँक खाते आधारशी लिंक करणे आवश्यक आहे. या योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपये असणे आवश्यक आहे. योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. राज्यात ४२ लाख ९९ हजार महिला लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. आतापर्यंत १ हजार ९३३ कोटी ९७ लक्ष रुपये पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आले आहेत. नागपूर विभागात दिलेल्या उद्दिष्टांमध्ये नागपूर जिल्ह्यात १८ हजार २६२ लाभार्थ्यांच्या नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. पैकी १६ हजार २२० लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून १५ हजार १६९ महिलांना थेट लाभ मिळाला आहे. १ एप्रिलपासून नव्याने ७८९ नवीन लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे. योजनेच्या लाभासाठी १८ ते ५५ वयोगटातील महिला पात्र आहे. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी उत्पन्नाची अट नाही. योजनेच्या लाभासाठी राज्य अथवा केंद्र शासनाच्या तसेच खाजगी आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आवश्यक आहे.

**अनिल गडेकर** / नागपूर

### प्लॅस्टिकमुक्त भारत

'प्लॅस्टिकमुक्त भारत' हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. याचा उद्देश पर्यावरण वाचवणे आणि प्रदूषण कमी करणे हा आहे. प्लॅस्टिक हा नष्ट न होणारा पदार्थ असून तो माती, पाणी आणि हवेच्या प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतो. यामुळेच भारत सरकारने प्लॅस्टिकमुक्त भारत मोहीम सुरू केली आहे. प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या आणि अन्य वस्तू मोठ्या प्रमाणात वापरण्यात येतात. मात्र त्यांची विल्हेवाट लावणे कठीण होते. त्यामुळे नद्या, समुद्र आणि जमिनी प्रदूषित होतात. प्लॅस्टिकमुळे प्राण्यांचे आणि पक्ष्यांचे आरोग्य धोक्यात येते. माणसाच्या आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. प्लॅस्टिकमुक्त भारतासाठी आपण कापडी पिशव्या, कागदी पिशव्या, स्टीलच्या भांड्यांचा वापर करायला हवा. सरकारने अनेक ठिकाणी सिंगल युज प्लॅस्टिकवर बंद घातली आहे. या मोहिमेत प्रत्येक नागरिकाने सहभागी होऊन पर्यावरण संरक्षणासाठी योगदान द्यावे. 'प्लॅस्टिकमुक्त भारत : सुंदर आणि निरोगी भारत' हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आपण सगळ्यांनी प्रयत्न केले तर भविष्यातील पिढीसाठी एक स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त भारत तयार करू शकतो.

**सोहम प्रशांत पेंडसे** / ९०२८६७५५१८

### मोबाईलच्या आहारी बालपण आणि तरुण पिढी

आज मोबाईल प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. लहानांपासून तरुणांपर्यंत सर्वजण मोबाईलच्या वापरात गुंतलेले दिसतात. तंत्रज्ञानाने मानवाचे जीवन सोपे केले असले, तरी त्याचे दुष्परिणामही तितकेच गंभीर आहेत. विशेषतः बालपण आणि तरुण पिढी मोबाईलच्या आहारी जात असल्याची चिंताजनक स्थिती आहे. पूर्वीची बालपणं खेळ, मैदानी उपक्रम, मित्रांसोबतची मस्ती आणि कुटुंबातील संवाद यातून समृद्ध होत असे. आजचे बालपण मोबाईलच्या स्क्रीनमध्ये कैद झाले आहे. मुले तासन्तास व्हिडीओ गेम्स, कार्टून, यूट्यूब किंवा सोशल मीडियामध्ये गुंतलेली दिसतात. यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर विपरीत परिणाम होतो. तरुण पिढीमध्येही मोबाईलचे व्यसन वाढत आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन गेम्स, नोटिफिकेशन्स यामुळे लक्ष विचलित होते. मोबाईल अतिवापरामुळे डोळ्यांचे विकार, लठ्ठपणा, चिडचिडेपणा, एकाग्रतेचा अभाव यांसारख्या समस्या उद्‌भवतात. तसेच, इंटरनेटवर उपलब्ध असलेली चुकीची माहिती किंवा अयोग्य कंटेंट मुलांच्या मनावर नकारात्मक परिणाम करू शकतो. मानसिक विकृतीची समस्या निर्माण तर होतेच; मुलं हिंसकही बनताहेत. मोबाईल व सातत्याने गेम खेळल्याने मुलांची कागदावर लिहिण्याची गती कमी झाली आहे; नव्हे त्यांना लिहिताच येत नाही. या समस्येवर उपाय म्हणून पालकांनी आणि शिक्षकांनी सजग राहणे आवश्यक आहे. मुलांनीही मोबाईलचा मर्यादित आणि योग्य वापर कसा करावा. मैदानी खेळ, वाचन, सर्जनशील उपक्रमांकडे वळले पाहिजे. कुटुंबात संवाद वाढविणे आणि मोबाईलशिवाय वेळ घालवण्याची सवय लावणेही महत्त्वाचे आहे.

**अनंत कपाळे** /९३७३१०२८९८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सामाजिक समता सप्ताहानिमित्त शिष्यवृत्ती धनादेशांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० एप्रिल -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष, संत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे १५० वे वर्ष तसेच महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' ८ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी (दि.९) रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विधी व सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान पायल अतुल नन्नावरे, आदित्य दीपक कदम, स्वप्नील माने, वैष्णवी बीडबाग, निशा खुडे आणि सुमीत सावंत या विद्यार्थ्यांना स्वाधार योजना व इतर शिष्यवृत्ती योजनांतर्गत प्रत्येकी ४५ हजार रुपयांचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने तसेच प्राचार्य डॉ. संदीप देशमुख उपस्थित होते.



# 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' मोहिमेत धाराशिव अव्वल ठरणार : अर्चनाताई पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० एप्रिल -**

छत्रपती संभाजीनगर येथील मंथन सभागृह, एम.आय.टी. इंजिनीअरिंग कॉलेज येथे 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' या विभागीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यशाळेत तेरा जिल्ह्यांतील आरोग्य विभागाचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी सहभागी होते.

कार्यक्रमाला सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, धाराशिव जि.प.च्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, उपाध्यक्षा वर्षाताई गायकवाड यांच्यासह सरपंच, पंचायत समिती सभापती व विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' हे केवळ अभियान नसून लोकसहभागातून उभी राहणारी व्यापक आरोग्य चळवळ आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलणार असून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा घरपोच उपलब्ध होतील. उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे हे या अभियानाचे वैशिष्ट्य आहे. गावागावांत जनजागृती करून तपासण्यांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे, असे सांगितले. यावेळी बोलताना अर्चनाताई यांनी धाराशिव जिल्हा पूर्णपणे 'आरोग्य संपन्न' करण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. त्या म्हणाल्या, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. शासनाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण कायापालट करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. असे त्या म्हणाल्या. या अभियानात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागासोबतच ग्राम विकास, महिला व बालकल्याण, शिक्षण तसेच इतर सर्व विभागांचा समन्वय साधला जाणार असून लोकसहभागातून ही चळवळ प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. उपाध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करताना ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या माध्यमातून लसीकरण, माता-बाल संगोपन व स्वच्छता मोहिमेला गती देण्यात येणार असल्याचे सांगितले.

या कार्यशाळेस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर,जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वरिष्ठ अधिकारी व आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

### ग्रामपातळीवर आरोग्य क्रांतीचा संकल्प :

कार्यशाळेत पुढील प्रमुख मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला -स्वच्छता व पाणी व्यवस्थापन, शुद्ध पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनाद्वारे साथीच्या आजारांना प्रतिबंध. लोकसहभाग- ग्रामपंचायत व ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे. शंभर टक्के लसीकरण- प्रत्येक बालक व गरोदर मातेचे वेळेत लसीकरण पूर्ण करणे, कुपोषण निर्मूलन- अंगणवाडी व आरोग्य विभागाच्या समन्वयातून कुपोषणमुक्त जिल्हा घडविणे. या सकारात्मक उपक्रमामुळे धाराशिव जिल्हा 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानात आरोग्य क्षेत्रात आदर्श निर्माण करेल, असा विश्वास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी व्यक्त केला आहे.

# परंड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारला; नागरिकांत जल्लोष




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० एप्रिल -**

शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर रातोरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा उभारण्यात आल्याने नागरिकांना सुखद धक्का बसला. शुक्रवार, दि.१० एप्रिल रोजी सकाळी नागरिकांना आंबेडकर चौकात पुतळ्याचे दर्शन होताच ही बातमी शहरभर वाऱ्यासारखी पसरली.

बार्शी रोडवरील आंबेडकर चौकात मोठी गर्दी झाली असून आंबेडकर प्रेमी व बहुजन समाज बांधवांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

यावेळी नगराध्यक्ष जाकिर सौदागर, शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाध्यक्ष रणजीत ज्ञानेश्वर पाटील, उपनगराध्यक्ष समरजित सुजितसिंह ठाकूर, विश्वजीत पाटील, राहुल बनसोडे, संजय कुमार बनसोडे, नगरसेवक वाजिद भैय्या दखणे, रत्नकांत शिंदे, प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे, दयानंद बनसोडे आदी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### ठरावानंतर उभारणी

दोनच दिवसांपूर्वी नगराध्यक्ष जाकिर सौदागर यांच्या अध्यक्षतेखाली नगरपालिकेत महापुरुषांचे पुतळे उभारण्यासंदर्भात सर्वसाधारण सभा पार पडली होती. या सभेत पुतळे उभारण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला होता.

### प्रशासनाचे आवाहन

पुतळा परिसर स्वच्छ ठेवून शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासन व नगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# भातंब्री शाळेचा स्नेहसंमेलन सोहळा; विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० एप्रिल -**

तालुक्यातील भातंब्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्र शासनाच्या 'गुढीपाडवा प्रवेश वाढवा' उपक्रमांतर्गत इयत्ता पहिली व इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यावेळी जि.प. सदस्या सीमा माडजे, प्राचार्य वैजनाथ घोडके, मोहन भोसले, भैरवनाथ माडजे, महेंद्र कावरे, गोविंद डोंगरे, सरपंच कृष्णा लोंढे, महादेव राऊत, जयहरी वागुलकर, तुकाराम बंडगर, शीलवंत बंडगर, शीतल बंडगर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे वही व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# ईट येथे आजपासून राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचा जल्लोष; 'ईटरत्न' पुरस्कारांनी होणार सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१० एप्रिल -**

भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रवीण देशमुख यांच्या संकल्पनेतून ईट येथे बाल व प्रौढ कलाकारांना राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

दि.११ व १२ एप्रिल रोजी येथील पी.ए.श्री. आदर्श जिल्हा परिषद शाळेच्या खुल्या प्रांगणात राज्यस्तरीय भव्य नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम सलग दोन दिवस चालणार असून, राज्यातील बाल व प्रौढ कलाकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. याच कार्यक्रमाच्या माध्यमातून ईट गावातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'ईटरत्न' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

### अशी आहेत बक्षिसे...

**बाल गट (समूह नृत्य) :** प्रथम ३१ हजार रूपये, सुनील भोईटे, द्वितीय २१हजार रूपये युवराज हुंबे, तृतीय ११ हजार रूपये बालाजी गुंजाळ, उत्तेजनार्थ ७ हजार रूपये बद्रीनाथ लिमकर. **प्रौढ गट (समूह नृत्य) :** प्रथम ५१ हजार रूपये संजय गाढवे, द्वितीय ३१ हजार रूपये विक्की चव्हाण, तृतीय २१ हजार रूपये विशाल ढगे, उत्तेजनार्थ ११ हजार रूपये समाधान सातव. **बाल गट (वैयक्तिक) :** प्रथम २१ हजार रूपये नागनाथ नाईकवाडी, द्वितीय ११ हजार रूपये निलेश शेळवणे, तृतीय ७ हजार रूपये युवराज तांबे, उत्तेजनार्थ ५ हजार रू. केशव चव्हाण. **प्रौढ गट (वैयक्तिक) :** प्रथम २५ हजार रू. रामकिसन गव्हाणे व अजित पवार, द्वितीय २१ हजार रू. बाळासाहेब मांगले, तृतीय ११ हजार रूपये गोरख शिंदे, उत्तेजनार्थ ७ हजार रूपये बाळासाहेब हाडुळे.

# नळदुर्ग येथे क्षयरुग्णांना फुड बास्केट वाटप

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० एप्रिल -**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधीक्षिका डॉ. चंचल बोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत क्षयरुग्णांसाठी ६ फुड बास्केटचे वाटप करण्यात आले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरदास तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात जागतिक आरोग्य दिनानिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानांतर्गत गरजू क्षयरुग्णांना सकस व संतुलित आहार उपलब्ध करून देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने फुड बास्केट वाटप केले जाते. या उपक्रमास प्रतिसाद देत नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने सहा फुड बास्केट प्रदान केले.

कार्यक्रमास नगरसेवक तानाजी जाधव, शशिकांत पुदाले, छमाबाई राठोड, पद्माकर घोडके, अनिल राठोड, डॉ. सुरेंद्र मडके, डॉ. भोरे, महेश पाठक, देविदास जाधव तसेच उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# डिकसळ ग्रामस्थांचे विकासकामांसाठी निवेदन; मूलभूत सुविधांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१० एप्रिल -**

डिकसळ (ता. कळंब) येथील नागरिकांच्या वतीने जिल्हा परिषद धाराशिवच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांना विविध विकासकामांबाबत निवेदन सादर करण्यात आले. या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी करण गायके यांनी केली आहे.

निवेदनात सम्राट अशोक नगर परिसरात बौद्ध बांधवांसाठी बुद्ध विहार उभारण्यासाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. धार्मिक व सामाजिक उपक्रमांसाठी ही सुविधा अत्यंत आवश्यक असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे. तसेच एकता नगर येथे अहिल्यादेवी होळकर मंदिरासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. स्थानिक नागरिकांच्या श्रद्धास्थानासाठी मंदिर उभारणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे. याशिवाय एकता नगर परिसरात मूलभूत सुविधांची कमतरता असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामध्ये रस्त्यांची दुरुस्ती, नवीन रस्ते बांधकाम, नाली व्यवस्था, लाईटचे पोल व रस्ते दिवे उभारण्याच्या मागण्या करण्यात आल्या आहेत.

वरील सर्व बाबी नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असून प्रशासनाने याकडे सहानुभूतीपूर्वक लक्ष देऊन लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# तेरखेडा येथे सौर प्लेट चोरी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० एप्रिल -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे शेतकऱ्यांच्या सौर ऊर्जा प्रकल्पातील प्लेट चोरीची घटना उघडकीस आली आहे.

शेतकरी वंदना रविकांत उमरडंड यांच्या शेतातील सुमारे साडेसात एचपी क्षमतेच्या प्रकल्पातील सौर प्लेट अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. बोरवेल सुरू करण्यासाठी गेलेल्या नातेवाईकांना ही बाब लक्षात आली. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, याप्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# उमरग्यात कक्कय्या महाराज जयंती उत्साहात




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१० एप्रिल -**

बाराव्या शतकातील थोर शिवशरण व क्रांतीकारक वीरशैव कक्कय्या महाराज यांची जयंती उमरगा शहरात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ढोल-ताशांचा गजर आणि लेझीम पथकांच्या शिस्तबद्ध सादरीकरणामुळे संपूर्ण शहर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले.

मिरवणुकीची सुरुवात गौतम नगर येथील चौकातून करण्यात आली. यावेळी कक्कय्या महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मा.आ. ज्ञानराज चौगुले, नगराध्यक्ष किरण गायकवाड, सभापती ॲड. आकांक्षा चौगुले, दत्ता कटकधोंड, जितेंद्र चौगुले, संदीप चौगुले आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मिरवणुकीत सहभागी लेझीम पथकांच्या आकर्षक सादरीकरणाने आणि ढोल पथकाच्या कडकडाटाने वातावरणात अधिकच रंगत आली. संपूर्ण शहरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

तालुकाध्यक्ष संदीप चौगुले यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मिरवणुकीच्या यशस्वितेसाठी अंबादास सोनकावडे, ज्योतिर्लिंग सोनकावडे, सुरज कटके, लक्ष्मण खरटमोल, केतन कटके, सटवाजी चौगुले, शरद कटके, संतोष कटके, प्रशांत सोनकवडे, जयदीप सोनकवडे, पारपा कटके, कृष्णा कटके, खंडू कटके, मनोज जाधव आदींनी परिश्रम घेतले.

# आरळी बुद्रुक येथे शिवजयंतीनिमित्त क्रिकेट स्पर्धेला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० एप्रिल -**

तालुक्यातील आरळी बुद्रुक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलात आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला क्रीडाप्रेमी व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे या स्पर्धेत सोलापूर, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील तब्बल ४८ ग्रामीण क्रिकेट संघांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे.

मंगरूळ जिल्हा परिषद गटाच्या नवनिर्वाचित सदस्या सीमा भैरवनाथ माडजे (रोचकरी), आरळी पंचायत समिती गणाचे सदस्य कृष्णा देवानंद रोचकरी तसेच युवा उद्योजक गणेश पुजारी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. शिवजयंतीच्या औचित्याने आयोजित या स्पर्धेमुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे. विविध गावांतील क्रिकेट संघांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला असून प्रत्येक संघ विजयासाठी जोरदार प्रयत्न करताना दिसत आहे. मैदानावर रंगतदार सामने होत असून प्रेक्षकांचीही मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक इसाक पटेल, लोहारा तालीम संघाचे अध्यक्ष दयानंद साळुंखे, पैलवान मसूद शेख बादोला, भैरवनाथ मांडजे, महेश गवळी, बाबासाहेब भोसले, महेश कचरे, लक्ष्मण कचरे, नागेश सरडकर, आयोजक संजय पारवे, बाजीराव जाधव, सचिन उकरंडे, निवृत्ती कोळी, कालिदास पारवे आदी उपस्थित होते.

ही स्पर्धा पुढील काही दिवस सुरू राहणार असून विजेत्या संघासाठी आकर्षक पारितोषिकांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# आळणी जिल्हा परिषद शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात; गुणवंतांचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० एप्रिल -**

तालुका व जिल्हा धाराशिव येथील आळणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा परिषद धाराशिवच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील उपस्थित होत्या. यावेळी शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, गटशिक्षणाधिकारी सय्यद असरार, विस्तार अधिकारी जंगम, प्रकाश पारवे, चौरे, उषा सर्जे, सरपंच प्रमोद वीर, उपसरपंच कृष्णा गाडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा संजीवनी पौळ, उपाध्यक्षा अफसाना शेख, केंद्रप्रमुख महेश अनपट, प्रमोद माळी, मोकाशी, दिवाणे तसेच शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष इतबारे आदी उपस्थित होते. यावेळी एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. दिव्या प्रशांत वीर तसेच नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या विद्यार्थिनी श्रद्धा निंबाळकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बशीर तांबोळी यांनी केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अर्चनाताई पाटील यांनी विविध शासकीय योजनांची माहितीही त्यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल सूर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन हनुमंत माने यांनी मानले.

# अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या मुलाचा आईने प्रियकराकरवी केला खून

## स्थागुशाने ४८ तासांत तीनही आरोपींना केले अटक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**

सेनगाव पोलिस ठाणे हद्दीतील जामदया शिवारात दि ८ एप्रिल रोजी अनोळखी तरूणाचा मृतदेह आढळून आला होता. याप्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत तांत्रिक पध्दतीने तसेच गोपनीय माहीतीच्या आधारे या खूनातील तीन आरोपींना अटक केली असून अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या मुलाचा आईनेच प्रियकराकरवी खून केल्याची स्पष्ट झाले आहे. या तीनही आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून पुढील तपास पोलिस करीत असल्याची माहीती पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

येथील पोलिस मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माहीती देतांना पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी सांगितले की, सेनगाव तालुक्यातील जामदया शिवारात जामदया ते खिल्लार जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला नालीत अनोळखी प्रेत अज्ञात आरोपीने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून कोठूनतरी आणून मयताची ओळख पटू नये म्हणून पुरावा नष्ट व्हावा या उद्देशाने मयताच्या डोक्यात दगड मारून खून केला होता.

या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडे सोपविण्यात आला. घटनास्थळी पोलिसांच्या पथकांनी भेट दिली. मयताची ओळख पटविण्यासाठी व घटनेचा उलगडा करण्यासाठी सर्व प्राथमिक पुरावे हस्तगत केले. याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणातील मयताची ओळख झाल्यानंतर मयत हा वढव ता लोणार जि बुलढाणा येथील असल्याचे कळल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहीतीच्या आधारे आरोपीचा शोध घेतला असता आरोपी रामदास विश्राम तनपुरे वय ६५ रा वढव, ता लोणार, जि बुलढाणा याच्याकडे विचारपूस केली असता त्याने मयत सचिन रामकिशन राजगुरू याची आई लिलाबाई हिच्याशी असलेल्या अनैतिक संबंधामध्ये लिलाबाई हिचा मुलगा सचिन अडथळा होत असल्याने तिच्या सांगण्यावरून रामदास तनपूरे याने नरेश साबन्या पवार यास २५ हजार रूपये देण्याचे ठरवून त्याच्या मदतीने खून केल्याची कबुली दिली. तसेच घटना पूर्ण झाल्यानंतर रामदास तनपूरे याने नरेश पवार यास २५ हजार रूपये दिले. त्यानंतर मयताची आई लिलाबाई रामकिशन राजगुरू, नरेश साबन्या पवार या दोघांना ताब्यात घेण्यात आले. याबाबत विचारणा केली असता आरोपी नरेश साबन्या पवार याने रामदास तनपूरे याच्यासह मयत सचिनला पाहुण्यांकडे जायचे असे सांगून सोबत साखरा येथे दारू पाजून जामदया शिवारात जामदया ते खिल्लार रस्त्याच्या बाजूला मयताच्या डोक्यात दगड मारून खून केल्याची कबुली दिली आहे. तीनही आरोपींना ताब्यात घेवून उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, मयुर रसाळ, स्थागुशाचे पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दिलीप मोरे, सपोनि दिपक मस्के, नलवार, नितीन गोरे, संदीप जाधव, पांडुरंग राठोड, विकी कुंदनानी, रवी स्वामी, पाईकराव,धनंजय क्षीरसागर, इंगोले, दत्ता नागरे, इरफान पठाण, सायबर शाखेने केली आहे.

# दृढनिश्चय व वेळेचे महत्व ओळखून यश संपादन करा- गुप्ता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजातील योगदान अत्यंत मोठे असून त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून दृढनिश्चयाचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन वेळेचे महत्त्व ओळखत दृढनिश्चयाने शिक्षण घेतल्यास यश निश्चित मिळेल, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार तानाजी मुटकुळे, समाज भूषण पुरस्कारार्थी मधुकर मांजरमकर तसेच विविध मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वेळ ही अमूल्य असून तिचा योग्य उपयोग केल्यास यश मिळविणे शक्य आहे. विविध स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक संधींचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी आपले कार्यकर्तृत्व सिद्ध करावे, असे त्यांनी नमूद केले.

आमदार तानाजी मुटकुळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिकवणुकीचे पालन करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविणे हीच खरी आदरांजली आहे. तसेच विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून वंचित घटकांचे सक्षमीकरण करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त गीता गुठ्ठे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. यावेळी सामाजिक समता सप्ताहानिमित्त आयोजित निबंध, वक्तृत्व व पथनाट्य स्पर्धांतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे लाभार्थी प्रदीप संजय जाधव यांना २३ हजार ५०० रुपयांचा धनादेश, तर परराज्यात शिक्षण घेणारे विद्यार्थी जयदीप ज्ञानबाराव वाठोरे यांना २ लाख ८५ हजार रुपयांच्या शिष्यवृत्तीचा धनादेश प्रातिनिधिक स्वरूपात वितरित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास विविध आश्रमशाळा, निवासी शाळा, वसतिगृहातील विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पूलाखाली ड्रेनेजचे घाण पाणी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**

शहरातील जिजामाता नगर भागातील गायत्री मंदिर परिसराजवळ असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाखाली सध्या पाणी साचल्याने तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे, हे पाणी पावसाचे नसून नगरपालिकेच्या ड्रेनेज लाईनमधून गळती झालेले सांडपाणी असल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. यामुळे स्थानिक नागरिकांसह वाहनधारकांचे आरोग्य धोक्यात आले असून, नगर परिषद प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संतापलेले नागरिक करत आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस नसतानाही गायत्री मंदिर परिसरातील उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. लांबून पाहणाऱ्याला हे पावसाचे पाणी वाटत असले, तरी प्रत्यक्षात ही नगरपालिकेच्या ड्रेनेजची 'भेट' आहे. ड्रेनेज लाईन फुटल्यामुळे किंवा तुंबल्यामुळे हे सर्व घाण पाणी रस्त्यावर आणि पुलाच्या मोकळ्या जागेत साचत आहे.



साचलेल्या या घाण पाण्यामुळे परिसरात डासांचे प्रमाण वाढले असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांची भीती निर्माण झाली आहे. या भागातून ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांना नाकावर रुमाल धरून चालावे लागत आहे. घाण पाण्याचा निचरा होत नसल्याने परिसरात दुर्गंधी सुटली असून, स्थानिक रहिवाशांचे जगणे कठीण झाले आहे.

हे पाणी पावसाचे नसून ड्रेनेजचे घाण पाणी आहे. नगरपालिकेला वारंवार कल्पना देऊनही यावर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. आमच्या आरोग्याशी हा खेळ सुरू आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया या भागातील नागरिकांनी दिली आहे. लवकरात लवकर या समस्येचे निराकरण न झाल्यास आंदोलनाचा पवित्रा घेण्याच्या तयारीत स्थानिक नागरिक आहेत.



**हिंगोली- कयाधू नदीतील पाणी बोगद्याद्वारे इसापूर धरणात सोडण्यात येणार असून या कामांसाठी खरबी येथे मोठमोठ्या मशीनरी आणि यंत्राद्वारे युध्दपातळीवर काम सुरू आहे. या कामाला हिंगोली तालुक्यातून मोठा विरोध होत आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### गोरेगाव पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक



हिंगोली- सेनगाव तालुक्यातील गोरेगाव पोलिस ठाण्यात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी आरटीओ, महावितरण व ग्रामपंचायतीची ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय मिरवणुकांना परवानगी देण्यात येणार नाही तसेच डीजेवर बंदी असून कोणीही मिरवणुकीत डीजे लावू नये असे आवाहन सपोनि झळके यांनी केले. यावेळी गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या गावांतील पोलिस पाटील यांच्यासह शांतता समितीचे सदस्य व पदाधिकारी, पोलिस कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी शांततेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करावी असे आवाहन सपोनि झळके यांनी केले.

### डॉ आंबेडकर जयंतीनिमित्त स्वच्छता शिबीर

हिंगोली- हिंगोली नगर परिषद, समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह अनुषंगाने शहरातील जवळा पळशी रस्ता, सिध्दार्थ नगर येथील बुध्दविहार येथे स्वच्छता शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. या मोहीमेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, नगराध्यक्षा सौ रेखाताई बांगर, मुख्याधिकारी सय्यद रफीक कंकर, सहायक समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे, नगरसेवक कय्युम पठाण, नगरसेवक सुखदेव बलखंडे, मधुकर मांजरमकर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, आकाश देशमुख, पल्लवी गीते यांच्यासह नगर परिषद व समाज कल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

### विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर रहावे- गायकवाड

हिंगोली- विद्यार्थ्यांनी गुटखा, तंबाखू, सिगारेट, अमली व मादक पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहून आपला बचाव करावा असे आवाहन मानसिक समुपदेशक निळकंठ गायकवाड यांनी केले. व्यसनाचे दोन प्रकार असून पदार्थाची व्यसन व वर्तनात्मक व्यसन जसे मोबाईल, इंटरनेट, गेमिंग व गॅम्बलिंग या प्रकारच्या व्यसनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून विद्यार्थ्यांनी चांगले मित्र, चांगले साहित्य यांचे वाचन करून मैदानी खेळ, योगासने करून शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहील याची काळजी घ्यावी असे प्रतिपादन केले. पी. एम. जि. प. प्रा. शाळा पांगरी येथील विविध उपक्रमांतर्गत व्यसनाधीनता या विषयावर व्याख्यान प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी झाडे तर मुख्य अतिथी कांबळे, शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन लिंबूळे, बद्री मुळे, माधव वायचाळ, ज्येष्ठ शिक्षक मारोतीराव जगताप, रामचंद्र ठाकरे, अनिल गिरी हे होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शिवाजी झाडे यांनी केले.

# वीज कंपनीच्या अधीक्षक अभियंत्याची १० लाखांची फसवणूक, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**

मुंबई महानगर गॅस पाईपलाईनचे पैसे थकीत असून तातडीने पैसे भरा असा संदेश देत एपीके फाईल पाठवून वीज कंपनीच्या अधीक्षक अभियंत्याच्या खात्यातील १० लाख रूपये काढून घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुरूवार दि १० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली येथील वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता आर एम चव्हाण यांचे मुंबई येथे घर आहे. दि ५ एप्रिल रोजी त्यांना एका मोबाईल क्रमांकावरून संपर्क साधण्यात आला. संपर्क साधणाऱ्या व्यक्तीने त्याचे नाव दिपक जोशी असल्याचे सांगत तुमच्या घराचे महानगर गॅस पाईपलाईनचे पैसे थकलेले असून त्यामुळे कनेक्शन बंद करीत असल्याचे सांगितले. यावेळी चव्हाण यांनी थकीत रक्कम भरण्याची तयारी दर्शवली होती. त्यानुसार भामट्यांनी त्यांच्या मोबाईलवर एपीके फाईल पाठवली. सदर फाईल डाऊनलोड झाल्यानंतर भामट्यांनी चव्हाण यांना ओटीपी मागितला. यावेळी त्यांनी ओटीपी दिल्यानंतर भामट्यांनी मोबाईल बंद केला. त्यानंतर भामट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून दोन वेळेस प्रत्येकी पाच लाख रूपये प्रमाणे १० लाख रूपयांची रक्कम काढून घेतली. दरम्यान, बॅंकेतून रक्कम काढण्यात आल्याबाबत चव्हाण यांच्या मोबाईलवर संदेश प्राप्त झाला नाही मात्र त्यांनी त्यांचा ईमेल तपासल्यानंतर त्यात त्यांच्या बँक खात्यातून दि ५ एप्रिल रोजी दोन वेळा व्यवहार झाल्याचे दिसून आले. या दोन्ही व्यवहारात प्रत्येकी पाच लाख रूपये काढण्यात आल्याचेही लक्षात येताच चव्हाण यांनी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी दिपक जोशी नावाच्या भामट्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक संदीप मोदे, उपनिरीक्षक राहुल महिपाळे, अशोक धामणे, शेख मुजीब, संजय मार्के, गणेश लेकुळे पुढील तपास करीत आहेत.

# वसमत शहरात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १० एप्रिल**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त वसमत नगर परिषदेच्यावतीने दि १० एप्रिल रोजी सर्व महत्वाच्या ठिकाणी व अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमधून स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

वसमत शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूतळ्याजवळील परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. यावेळी वसमत नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ सुनीता मनमोहन बाहेती, मुख्याधिकारी सय्यद रफीक, नगरसेवक दिलीप भोसले, वर्षा युवराज अवटे, स्वच्छता निरीक्षक बालाजी सोनवणे, माधव सुक्ते, शहर समन्वयक प्रवीण दहीवाळ, मुकादम भुजंग भिसे यांच्यासह सर्व स्वच्छता कर्मचारी, स्थानिक रहीवाशी यांच्या उपस्थितीत परिसराची स्वच्छता करण्यात आली.

# शिरड शहापूर जि प शाळेत डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १० एप्रिल**

तालुक्यातील शिरड शहापूर येथे महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विशेष विभागाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी -पुणे) चे समतादूत ॲड .सुकेश कांबळे यांनी सा. आयुक्त कार्यालय, हिंगोली व बार्टी चे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जि.प. प्रशाला, शिरड शहापूर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताह अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्य या विषयावर निबंध स्पर्धा घेतली. सदरील कार्यक्रमांमध्ये जि .प .प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक ढगे व सर्व मान्यवर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच राठोड यांनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन केले. तसेच चंद्रवंशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अनेक शिक्षक कर्मचारी वर्ग यामध्ये पाटील, व्यवहारे, चवरे, लामदाडे, निवडगे, चंद्रवंशी, खरात, कदम आदी शिक्षक वर्ग कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच निबंध स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. मोठ्या संख्येने कार्यक्रमास विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# व्यसनी तरूणाचा पोलिस ठाण्यासमोर गोंधळ, मोठ्या शिताफीने घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**

हिंगोली शहर पोलीस ठाण्यात गुरूवारी सायंकाळी व्यसनाधीन तरुण घुसला नशेमध्ये असलेल्या या तरुणाच्या हातात ब्लेड होती. पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यास ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यास तो स्वतःच्या हातावर ब्लेड मारून घेत होता. अखेर पोलिसांनी मोठ्या शिताफीने या तरुणाला ताब्यात घेतली असून त्याच्यासोबत एक महिला सुद्धा होती.



शहरातील इंदिरा गांधी चौक या भागामध्ये हा तरुण आणि त्याच्यासोबतची महिला नशेमध्ये धुंद होते. रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकी वाहनांना अडवून त्यांना शिवीगाळ करून त्यांच्याशी झटापट करून मोबाईल, वाहन चालकाच्या खिशातील पैसे काढण्याचा प्रयत्न करीत होता. जवळच असलेल्या ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर हा तरुण बेधुंद अवस्थेमध्ये आला पोलिसांनी त्याला प्रथम समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु पोलीस जवळ येतात हा तरुण त्याच्या हातात असलेल्या ब्लेडने स्वतःवर वार करीत असल्यामुळे पोलिसांनी मोठ्या समजदारीने या तरुणास पोलीस ठाण्याच्या बाहेर जात असताना बस स्थानकासमोर शिताफीने पकडले. त्याच्या हातातील ब्लेड घेऊन त्यास चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. सदरील घटना घडत असताना रस्त्यावर वाहतूक कोलंबी होती तसेच पोलीस ठाण्यासमोर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. पोलिसांनी या व्यसनी तरुणाला पकडल्यानंतर रस्त्यावरील वाहतूक सुरळीत झाली. पोलीस निरीक्षक संदीप मोदे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी मोठ्या शिताफिने बेधुंद झालेल्या तरुणाला पकडले.

## विविध वृत्त...

### आ. चिखलीकरांची उपस्थिती, महाराजस्व समाधान शिबीर

तभा वृतसेवा

**लोहा, दि. १० एप्रिल** - महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान करणे .नागरिकांच्या दैनंदिन तक्रारींचे एकाच ठिकाणी तात्काळ निवारण करणे व डिजिटल सेवांचा वापर करणे यासाठी तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत ७ मार्च ते ८मे या काळात सर्कल निहाय समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली कापशी बु येथे तिसरे महाराजस्व शिबिर संपन्न झाले. कापशी (बु) या ठिकाणी सामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी लोहा प्रशासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.एक चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, बीडीओ कुलकर्णी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते



### ईस्लापूर येथे १२ एप्रिल रोजी शिवजन्मोत्सव सोहळा

तभा वृतसेवा

**ईस्लापूर, दि. १० एप्रिल** -ईस्लापूर येथे जागर इतिहासाचा सोहळा आनंदाचा शिवजन्मोत्सव सोहळा दि. १२ एप्रिल रविवार रोजी होणार असून या सोहळ्यात शाहिरी, शिवगर्जना व पोवाड्याचा दणदणीत कार्यक्रम पार पडणार आहे.या कार्यक्रमाला शाहीर सम्राट डॉ. देवानंद माळी व बालगंधर्व शाहीर पृथ्वीराज माळी यांची उपस्थिती लाभणार आहे.

सदरील या कार्यक्रमाची ईस्लापूर येथील नवयुवकाच्या वतीने जय्यत तयारी सुरू असून हा कार्यक्रम ईस्लापूर येथील शासकीय विश्रामगृहाच्या समोरील प्रांगणामध्ये होणार आहे. या भव्य, दिव्य कार्यक्रमासाठी मंडप उभारणीचे काम जोरात सुरू असून सदरील या कार्यक्रमास सर्व शिवप्रेमी, शिवभक्तांनी व सर्व समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवावी असे आवाहन शिवजन्मोत्सव समिती ईस्लापूर सहस्त्रकुंड यांनी केले आहे.

### सिडको हस्तांतरणाच्या प्रश्नाची प्रतीक्षा आता लवकरच संपणार - आ.बोंढारकर

तभा वृतसेवा

**नवीन नांदेड, दि. १० एप्रिल** -सिडको घर हस्तांतरणाचा प्रश्न बऱ्याच वर्षापासून प्रलंबित आहे हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी समिती ही गटीत करण्यात आली होती .आता सदरील समितीकडून सकारात्मक अहवाल मिळाल्याने दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी हा प्रश्न सभागृहात मांडला होता. सदरील हस्तांतराच प्रश्न मिटणार असल्याचे माहिती आमदार बोंढारकर यांनी दिली.



सिडको येथील घरे मूळ मालकाच्या अनुपस्थितीत संबंधित करार करून घेणाऱ्या व्यक्तीच्या नामे रजिस्ट्री करून मिळावी हा हस्तांतरांचा प्रश्न बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असल्याने हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावे म्हणून सिडकोतील सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते व काही सामाजिक संघटनानी वारंवार पाठपुरावा केला आहे. तरी हा प्रश्न प्रलंबितच असल्याने दिनांक ५ एप्रिल रोजी सामाजिक कार्यकर्ते व शिवसेना उद्धव गटाचे प्रमोद मेड व पप्पू गायकवाड यांनी दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर यांची भेट घेऊन याविषयी सखोल चर्चा केली. तेव्हा या चर्चेस बोलताना आमदार बोढांरकर म्हणाले यासंबंधी गठीत करण्यात आलेल्या समित्यांचे अहवाल सकारात्मक असल्याने पुढील बैठक राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन आमदार बोंढारकर यांनी दिले .सदरील प्रश्न हा माझ्या मतदारसंघातील गोरगरीब नागरिकांचा असल्याने तो प्रश्न मार्गी लावल्याशिवाय राहणार नाही असेही आश्वासन या बैठकीत दिले.

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

तभा वृतसेवा

**फूलवळ, दि. १० एप्रिल** -शासन आपल्या दारी' अभियानांतर्गत नागरिकांना विविध सरकारी योजना आणि सेवांचा लाभ एकाच छताखाली देण्यात येणार आहे. कंधार तालुक्यातील फूलवळ येथील सिद्धिविनायक लॉन्स मंगल कार्यालयात १० एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत तहसील कार्यालय, पंचायत समितीचा आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, कृषी, एकात्मिक बाल विकास, भूमिअभिलेख, पशुवैद्यकीय आदी विभागांतर्गत येणाऱ्या सर्व सरकारी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. कंधार तालुक्यातील फुलवळ येथे १० एप्रिल २०२६ रोजी शुक्रवार या दिवशी शासन आपल्या दारी यामध्ये शिधापत्रिका, शासकीय प्रमाणपत्र (वय, राष्ट्रीयत्व, अधिवास, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला), संजय गांधी योजना, प्रधानमंत्री मातृवंदन योजना, कुटुंबकल्याण योजना, जन्म मृत्यू प्रमाणपत्र, कन्या समृद्धी योजना, विवाहनोंद. कुपोषित बालकांची तपासणी, जमीनमोजणी, भूमापन, महा डीबीटी नोंदणी, किसान क्रेडिट कार्ड, पशुसंवर्धन प्रशिक्षण, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, रमाई घरकुल योजना, सुकन्या समृद्धी योजना, आधार जोडणी आदी सरकारी योजनांचा समावेश आहे.

# फुलवळ येथे छ.शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास प्रतिसाद

## श्रीमती दोनूर अन्यना रेड्डी (भा.प्र. से.) उपविभागीय अधिकारी कंधार व तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले तक्रारींचे निवारण व विविध प्रमाणपत्राचे वितरण

तभा वृतसेवा/ होनाजी शेळगावे

**फुलवळ, दि. ९ एप्रिल** - शासन आदेशानुसार कंधार तालुक्यातील फुलवळ महसूल मंडळातील सहा तलाठी सज्याच्या गावातील शेतकरी व नागरिकांच्या समस्या जागेवरच सोडवण्याच्या हेतूने ता.१० एप्रिल २०२६ रोज शुक्रवारी फुलवळ येथील सिद्धिविनायक लॉन्स न्ड मंडप डेकोरेटर्स येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात प्रमुख्याने शेतकरी व नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करणे व विविध प्रमाणपत्राचे वाटप करणे हा मूळ उद्देश होता. त्या अनुषंगाने श्रीमती दोनूर अन्यना रेड्डी (भा.प्र. से.) उपविभागीय अधिकारी कंधार व तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी उपस्थितांच्या समस्या जाणून घेऊन त्या तक्रारींचे निराकरण केले व विविध प्रमाणपत्राचे वितरण केले.

या छत्रपती शिवाजी महाराज महारजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १ अंतर्गत आयोजित फुलवळ येथील शिबीरास पुढीलप्रमाणे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. त्यात



श्रीमती दोनुर अनन्या रेड्डी (भा.प्र.से.) उपविभागीय अधिकारी कंधार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात रामेश्वर गोरे (तहसिलदार कंधार), विमलबाई नागनाथ मंगनाळे (सरपंच फुलवळ), मुदीराज साहेब (ना. तह. कंधार), विनोद पावडे ( ना.त. पुरवठा कंधार), चंद्रकांत जाधव (पो. नि. कंधार), महेश पाटील (गट-विकास अधिकारी), कुलकर्णी साहेब (उप अधिक्षक भुमी अभिलेख कंधार), नाईक साहेब - (मंडळ कृषी अधिकारी), डॉ. मुस्ताक शेख साहेब - (समुदाय आरोग्य अधिकारी फुलवळ), पठाण साहेब - (उपअभियंता - चडएइ), राजेश जाधव (सा. बांधकाम विभाग), श्रीमती पाटील मॅडम (दुय्यम निबंधक कार्यालय) ,एल.एम. राजुरे (ए.महिला बालविकास विभाग), भालेराव साहेब (पशुधन वि. अधिकारी), एस. आर. शेख मंडळ अधिकारी फुलवळ, बालाजी केंद्रे तलाठी सज्जा फुलवळ यांच्या सह त्या त्या विभागाचे प्रमुख उपस्थित होते.महसूल मंडळ फुलवळ येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करतेवेळी उपविभागीय अधिकारी श्रीमती दोनूर अन्यना रेड्डी म्हणाल्या की आपल्या ज्या तक्रारी आहेत त्या लेखी स्वरूपात संबंधित विभागाकडे द्याव्यात त्यावर लवकरच तोडगा काढून त्या समस्यांचे निराकरण संबंधित अधिकारी वेळेत करतील अशी ग्वाही त्यांनी दिली. तर तहसीलदार रामेश्वर गोरे म्हणाले मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना बाबत सखोल मार्गदर्शन करत मुंबई अधिनियम प्रमाणे जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत सुधारणा विषयी सखोल माहिती त्याचबरोबर अकृषिक परवानगी रद्द करण्यात आलेल्या अद्यावत सुधारणा बाबत नागरिकांना योग्य मार्गदर्शन करून, एक वेळचे अधिमुल्य भरण्याच्या नवीन व्यवस्था बाबत नागरिकांमध्ये जनजागृती करून, उपस्थित शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व नागरिकांना योग्य मार्गदर्शन केले. त्याचबरोबर या अभियानांतर्गत एकूण २६ फेरफार निकाली काढण्यात आले, ७/१२ अभिलेखा मध्ये एकूण १२ अर्जावर दुरुस्ती करण्यात आली, ८ अ उताऱ्याचे ३१ वाटप करण्यात आले, तेच विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र असे एकूण ६४ प्रमाणपत्र देण्यात आले तर डिजिटल ७/१२ वाटप संख्या ४७ वाटप करण्यात आले.

सदर शिबिराचे प्रास्ताविक तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले तर सूत्रसंचलन पालसाहेब मुंडे यांनी केले. उपस्थित सर्व अधिकारी , कर्मचारी , विविध गावातून आलेले सरपंच , ग्रामपंचायत अधिकारी , पोलिस पाटील , शेतकरी , ग्रामस्थांचे व शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्वांचे फुलवळ महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी एस.आर.शेख यांनी आभार व्यक्त केले.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी फुलवळ महसूल मंडळातील सर्व तलाठी , ग्रामपंचायत अधिकारी , पोलीस पाटील, सरपंच, महसूल सेवक, अंगणवाडी कर्मचारी , सिद्धिविनायक लॉन्स अँड मंडप डेकोरेटर्स चे मालक नारायणराव मंगनाळे , चंदबस मंगनाळे , फुलवळ गावातील नागरिक व तरुणांनी परिश्रम घेतले. यावेळी फुलवळ महसूल मंडळाअंतर्गत गावातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, महिला व ग्रामस्थ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ योगेश राजपूत रुजू

तभा वृत्तसेवा

**बिलोली, दि. १० एप्रिल** – बिलोलीच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षकपदी डॉ योगेश राजपूत हे २ एप्रिल रोजी रुजू झाले आहेत.



डॉ राजपूत हे यापूर्वी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पाहत होते, त्यांना बढती मिळून ते बिलोलीच्या उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक म्हणून रुजू झाले आहेत. या रुग्णालयाची एक रेफरल सेंटर म्हणून मागील काळात निर्माण झालेली कलंकित प्रतिमा पुसून टाकत या रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य घेत शिस्तीला व रुग्णांच्या सेवेला प्राधान्य देत येथील कारभार रुळावर आणण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू व हे रुग्णालय लोकाभिमुख कसे होईल आणि दवाखान्यात आलेला रुग्ण समाधानी होऊन तंदुरुस्त होऊन आपल्या घरी कसा जाईल यावर आपलं लक्ष केंद्रित असेल शिवाय शासनाच्या सर्व मोफत योजनांचा लाभ रुग्णांना होईल यादृष्टीने रुग्णालयाची वाटचाल सुरू असल्याचे समाधान नागरिकांना पहावयास मिळेल असा माझा प्रयत्न राहील व याकामी मनात कसलीच पुर्वग्रहदुषित भावना न बाळगता रुग्णांनी व नागरिकांनी आम्हाला सहकार्य करावे असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ योगेश राजपूत यांनी केले.

## भीम जयंतीतून समाजाला दिशा ; डीजेऐवजी संस्कृतीला प्राधान्य

तभा वृत्तसेवा

**नायगांव, दि. १० एप्रिल** –

प्रतीवर्षा प्रमाणे राज्यात १४ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती च्या पार्श्वभूमीवर नायगांव तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाण्याच्या वतीने ६ एप्रिल रोजी शांतता समितीची बैठक उत्साहपूर्ण आणि सकारात्मक वातावरणात पार पडली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या बैठकीत पोलीस पाटील तसेच भीम जयंती मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.



बैठकीत येणाऱ्या जयंती उत्सवाचे नियोजन, मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, तसेच कोणत्याही प्रकारच्या अडचणी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. जयंती मिरवणुका शांतता, संयम आणि शिस्त यांचे पालन करत पार पाडाव्यात, असा ठाम संदेश यावेळी देण्यात आला.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांनी डीजे-मुक्त वातावरणात भीम जयंती साजरी करण्याचे आवाहन केले. त्यांनी पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून उत्सव साजरा करण्यास प्राधान्य देण्याचा सल्ला देत सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार आपण समाजात बंधुभाव, समता आणि कायद्याचा आदर जपला पाहिजे. जयंती हा केवळ उत्सव नसून त्यांच्या मूल्यांचे स्मरण करण्याचा दिवस आहे.

पोलीस प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला की, कोणत्याही प्रकारचे नियमभंग सहन केला जाणार नाही. त्यामुळे सर्व मंडळांनी जबाबदारीने वागून प्रशासनाला सहकार्य करावे आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यास हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले.

या बैठकीस कुंटूर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व पोलीस पाटील व विविध जयंती मंडळांचे पदाधिकारी उपस्थित राहिले. सर्वांनी एकमताने शांततामय आणि अनुशासित पद्धतीने भीम जयंती साजरी करण्याचा निर्धार व्यक्त करत प्रशासनाला पूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली.

## फुले-शाहू-आंबेडकर विचारांवर 'शताब्दी २०२६' अंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन

### ज्येष्ठ पत्रकार पाशम यादगिरी यांचे मुख्य व्याख्यान; कुलगुरू डॉ. मनोहर चासकर अध्यक्षस्थानी

तभा वृत्तसेवा

**नांदेड, दि. १० एप्रिल** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले यांच्या १९७ व्या जयंतीनिमित्त तसेच 'फुले-शाहू-आंबेडकर जयंती महोत्सव - शताब्दी २०२६' अंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या सिनेट हॉलमध्ये पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार असून, प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार तथा 'सा.का.' आणि 'तेलंगणा न्यूज टीव्ही'चे संपादक पाशम यादगिरी उपस्थित राहणार आहेत. ते महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा व परिवर्तनवादी विचारांचा सखोल उहापोह करणार आहेत. विशेष उपस्थितीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, हैदराबाद येथील कस्टम व जीएसटी विभागाचे माजी अधीक्षक महेश्वर राज, प्र-कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत वाविस्कर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनीता वाय. पाटील यांचा समावेश आहे. समतावादी व मानवतावादी विचारांचे समाजातील महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हा उपक्रम विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र तसेच प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. आयोजकांनी विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून विचारप्रबोधनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### दडून बसलेल्या आरोपींना पोलीस शोधताहेत रस्त्यावर !

तभा वृतसेवा

**नांदेड, दि. १० एप्रिल** –

शहरात ७० तासात पाच खूनाच्या घटना घडल्यानंतर नांदेड पोलीस ॲक्शन मोडवर आली आहे. शहरात विविध ठिकाणी कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात येत आहे तर नाकाबंदी देखील करण्यात येत आहे. परंतु गुन्हे करून सोशल मीडियाच्या माध्यमातून पुन्हा आव्हान देणारे हे सराईत गुन्हेगार रस्त्यावर सापडतील कसे असा प्रश्न जनता उपस्थित करत आहे. त्यातच संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक नव्हे तर बीट जादारांच्या नजरेतून भुरटे चोर लपत नाहीत, मग गुन्हेगारी वाढते कशी आणि हे गन्हेगार निसटतात कसे असाही प्रश्न जनता उपस्थित करत आहे.

सलग पाच खुनाच्या घटना सत्तर तासात घडल्याने राज्यात नांदेड पोलीस दल तथा शहरातील कायदा सुव्यवस्थेचे धिंडचडे निघत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस दलाने कडक भूमिका घेतली आहे. सोनू कल्याणकर यांच्या खून प्रकरणातील आरोपींना अटक देखील केली आहे. या आरोपींना पकडताना पोलिसांना गोळीबार देखील करावा लागला. पोलिसांची ही कारवाईक

## सक्षम पोलीस दल हेच मजबूत नेतृत्वाचे बळ -पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण

तभा वृतसेवा

**मुदखेड, दि. १० एप्रिल** - मुदखेड पोलीस स्टेशनच्या सभागृहात आज दि. ०८ एप्रिल रोजी दुपारी १:०० वाजता पोलीस विभागातील पदोन्नती व बदलीनिमित्त छोटेखानी सत्कार व निरोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुदखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण हे होते आपल्या अध्यक्षीय भाषणातून बोलताना चव्हाण यांनी म्हटले की सक्षम पोलीस दल हेच मजबूत नेतृत्वाचे बळ असल्याचे प्रतिपादन करत दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्यांचा उल्लेखनीय शब्दांत प्रशंसा व भविष्यकाळातील चांगले आरोग्य आणि भविष्यात पोलीस दलात अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांमध्ये त्यांचे कार्य उज्ज्वल व द्वैदिप्यमान राहील असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमात मुदखेड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नारायणसिंग रघुवंशी यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच मागील काही वर्षांपासून शहराच्या उत्तर भागात बीट जमादार म्हणून कर्तव्यदक्षपणे सेवा बजावणारे चंद्रशेखर मुंडे यांची किनवट येथे बदली झाल्याने त्यांनाही निरोप देण्यात आला यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे,पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गवई, मधुकर भिसे,चक्रधर,अंगत कादम, जिल्हा विशेष शाखेचे जामदार किशोर पाटील, अरविंद शिंगारपुतळे, सह आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी नगरपरिषदेचे पाणीपुरवठा सभापती श्यामचंद्रे,नगरसेवक उपेंद्र देवदे,नगरसेविका प्रतिनिधी महंमद नयुम बागवान,काँग्रेस पक्षाचे जिल्हा सहसचिव गिरीश अप्पा कोत्तावार,शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण,माजी उपनगराध्यक्ष करीम खान साब, नगरसेवक अविनाश चौदंते, अंकुश मामीडवार, ज्येष्ठ पत्रकार हाजी मोहम्मद अजगर हुसेन,नांदेड जिल्हा पत्रकार संघाचे सहसचिव ईश्वर पिन्नलवार,ज्येष्ठ पत्रकार संतोष पाटील गाडे,जयराम वने,प्रल्हाद मस्के,सिद्धार्थ चौदंते,



रुखमाजी शिंदे,राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष मोहम्मद बुऱ्हान,अतिक अहेमद, धम्मदाता कांबळे, अब्दुल रजाक, अमोल टेकले, नामदेव राहरे,हफिज कुरेशी, मोहम्मद हकीम, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संतोष सावंत यांनी केले तर आभार निवृत्त ए एस आय देशमुख यांनी महाराष्ट्र गीत सामूहिकपणे गात कार्यक्रमाची सांगता झाली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लातूरमधील युवकांना मिळणार नामांकित कंपन्यांमध्ये कामाची संधी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० एप्रिल :** केंद्र शासनाच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामार्फत युवकांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव देण्यासाठी 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील पात्र उमेदवारांना रिलायन्स इंडस्ट्रीज, एच.डी.एफ.सी. बँक आणि गेल (इंडिया) लिमिटेड यांसारख्या देशातील आघाडीच्या २००० कंपन्यांमध्ये ६ ते ९ महिन्यांची इंटर्नशिप करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

या प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांना प्रतिमहा ९ हजार रुपये स्टायपेंड दिला जाणार असून, ही रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल. या योजनेसाठी १८ ते २५ वयोगटातील इयत्ता १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर असलेले बेरोजगार तरुण पात्र आहेत. केवळ मानधनच नव्हे, तर प्रशिक्षणार्थींना ६ हजार रुपयांचे अतिरिक्त अनुदान आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षणही दिले जाणार आहे. सध्या या योजनेचा तिसरा टप्पा सुरू झाला असून, इच्छुकांनी तात्काळ https://pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर येथे संपर्क साधण्याचे आवाहन सहायक आयुक्त श्री. नि. ना. सूर्यवंशी यांनी केले आहे. मदतीसाठी तरुण दत्तात्रय कांबळे (९०२८२३८४६५) किंवा लहू भंडारे (८०५५९९२९००) यांच्याशी संपर्क साधून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी आपल्या करिअरची भक्कम पायाभरणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



## विविध वृत्त...

### 'सखे गं साजणी' तील कलाकारांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** येथील लातूर अर्दन कोऑपरेटि व तफे बॅकेतर्फ सखे गं सा जनी या चित्रपटातील कलाकारांचा सत्कार आयोजित केला होता. या चित्रपटात अभिजीत खांडकेकर, प्रार्थना बेहरे - जावकर, यांनी काम केले आहे. सत्कारावेळी गायक अभिजित सावंत, लेखक तथा दिग्दर्शक अभिषेक जावकर, विजय भाटे उपस्थित होते. यावेळी बॅकेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी, उपाध्यक्ष सी ए. लक्ष्मीरमण मालू, संचालक शुभ दा रेडडी, व्यवस्थापकीय संचालक नवनीत भंडारी, कार्यकारी संचालक सी ए . नरेश सूर्यवंशी, सर व्यवस्थापक सत्यनारायण खटोड, उप सरव्यवस्थापक रश्मी भंडारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### उद्या लातुरात रंगणार काव्यमैफल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** लातूर शहर व परिसरातील रसिक श्रोत्यांसाठी महाराष्ट्रातील नामवंत कवींनी साकारलेली बहारदार काव्यमैफल काव्यगंध - दरवळ कवितांचा या कार्यक्रमाचे आयोजन काव्यगंध रसिक मंडळी, लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार , १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता दयानंद सभागृह येथे पार पडणार आहे.

सदर कार्यक्रम पूर्णपणे बिगर-व्यावसायिक असून रसिक श्रोत्यांसाठी तो विनामूल्य खुला आहे. मराठी साहित्याचा समृद्ध वारसा जपणे आणि कवितेच्या माध्यमातून सामाजिक जाणीव जागृत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या काव्यमैफलीत महाराष्ट्रातील नामवंत कवी विशाल मोहीते (बुलढाणा), रोहित शिंगे (कोल्हापूर), यामिनी दळवी (मुंबई), नारायण पुरी (छत्रपती संभाजीनगर), रमजान मुल्ला (सांगली), विष्णू थोरे (नाशिक) हे आपल्या दर्जेदार कवितांचे सादरीकरण करणार आहेत. विविध विषयांवरील कवितांचा सुंदर मिलाफ रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन लातूरचे पोलीस अधी-क्षक अमोल तांबे यांच्या हस्ते होणार असून, विशेष उपस्थिती म्हणून पोलीस उपअधीक्षक समीरसिंह साळवे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षण अधिकारी तृप्ती अंधारे उपस्थित राहणार आहेत.

तरी साहित्यप्रेमी, विद्यार्थी आणि रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शब्दांच्या या सुगंधाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजक काव्यगंध रसिक मंडळी, लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ पदभरती प्रक्रियेला उच्च न्यायालयाची स्थगिती नाही; विद्यापीठ प्रशासनाचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (च-ऋडण) द्वारे सुरू असलेल्या १७५ पदांच्या भरती प्रक्रियेला उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याची बातमी काही प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे संबंधित उमेदवारांकडून भरती प्रक्रियेबाबत विचारणा होत आहे. याबाबत विद्यापीठ प्रशासनाने स्पष्टीकरण देताना सांगितले की, विद्यापीठाने २७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार ही भरती प्रक्रिया निरंतर सुरू आहे. या अनुषंगाने उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने १ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार विद्यापीठाला ही भरती प्रक्रिया पुढे सुरू ठेवण्याची अनुमती दिली आहे. न्यायालयाच्या अंतरिम निर्देशानुसार, केवळ १४ याचिकाकर्ते ज्या पदांवर सध्या कार्यरत आहेत, ती पदे वगळून उर्वरित सर्व पदांची भरती प्रक्रिया सुरू राहणार आहे.

या प्रकरणातील तांत्रिक बाबी स्पष्ट करताना विद्यापीठाने नमूद केले की, संबंधित याचिकाकर्ते हे बाह्य कंत्राटदारामार्फत पुरवण्यात आलेले मनुष्यबळ असून ते विद्यापीठाचे थेट कर्मचारी नाहीत, ही वस्तुस्थिती न्यायालयासमोर मांडण्यात आली आहे. या भरतीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी भरती प्रक्रियेबाबत कोणताही संभ्रम मनात न ठेवता अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा. भरतीबाबतची सर्व अद्ययावत माहिती विद्यापीठाच्या www.mafsu.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे, असे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# संघ कोणाच्या विरोधात काम करत नाही

## डॉ. कृष्णगोपालजी (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सह सरकार्यवाह)





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० एप्रिल :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीत संघावर तीन वेळा बंदी आली; मात्र संघाने कधीही बदल्याची भावना ठेवली नाही. कारण संघ कोणाच्या विरोधात काम करत नाही, तर सकारात्मक दृष्टिकोनातून हिंदू समाजाचे संघटन करण्याचे कार्य करतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्ण गोपाल यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'प्रमुख नागरिक संगोष्ठी (परिसंवाद)' या कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी सायंकाळी लातूर शहरात करण्यात आले होते. या परिसंवादात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लातूर जिल्हा संघचालक प्रा. राजेश्वर बेंबडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. कृष्णगोपालजी म्हणाले की, १९२५ साली संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी त्या काळातील देशातील सर्व क्षेत्रांतील अधोगतीचा अभ्यास करून सामान्य माणसांमध्ये राष्ट्रभक्ती व राष्ट्रभावना जागृत करण्याचा निर्धार केला. आज संघाला शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत, ही महत्त्वाची बाब आहे.

संघाचे मुख्य कार्य 'व्यक्ती निर्माण' हे असून, या व्यक्ती समाजातील विविध क्षेत्रांत समर्पण भावनेने देश व समाजासाठी कार्यरत असतात. सध्या देशात सुमारे ९० हजार दैनंदिन शाखा असून, ४० हजार ठिकाणी साप्ताहिक किंवा मासिक मिलन आयोजित केले जाते. एकूण सुमारे १ लाख ३० हजार ठिकाणी संघाच्या माध्यमातून व्यक्ती निर्माणाचे कार्य सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

प्रश्नोत्तराच्या सत्रात त्यांनी सांगितले की, संघाचे कार्यकर्ते शिक्षण, राजकारण, वैद्यकीय सेवा, धार्मिक संघटन तसेच व्यसनमुक्ती सारख्या सामाजिक समस्यांवरही कार्य करतात. पंजाबमध्ये 'नशामुक्ती अभियान' राबवण्यात येत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच बंगालमधील सीमावर्ती भागात हिंदू मुला-मुलींना शिक्षण व संस्कार मिळावेत यासाठी कोलकाता परिसरात सुमारे ३०० शाळा कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संघ फक्त भारतीय जनता पक्षालाच पाठिंबा देतो का? या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, १९७७ मध्ये स्थापन झालेल्या जनता पक्षात विविध विचारांचे नेते एकत्र आले होते. त्या वेळी काहींनी संघाशी संबंधित निष्ठा सोडण्याची अट घातली. त्यामुळे संघ विचारांचे कार्यकर्ते बाहेर पडले आणि त्यातून भारतीय जनता पक्ष ची स्थापना झाली.

आजही संघ कार्यकर्त्यांना कोणत्याही राजकीय पक्षात जाण्याची मुभा आहे; मात्र संघाच्या दैनंदिन कामात पदाधिकारी असलेल्यांना राजकारणात प्रवेश करता येत नाही. सर्व पक्षांत संघ स्वयंसेवकांनी जावे, अशी अपेक्षा असली तरी इतर पक्ष त्यांना स्वीकारत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. काही पक्षांना अशी भीती वाटते की, स्वयंसेवक मोठ्या संख्येने आले तर पक्षावर त्यांचा प्रभाव वाढेल.

समाजातील सज्जन शक्तीने व तरुणांनी संघाच्या सेवा कार्यात सहभागी होऊन आपला वेळ द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या परिसंवादाचे सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले. प्रास्ताविक डॉ. विजय जाधव यांनी केले, तर आभार सीए सचिन बाहेती यांनी मानले. शहरातील प्रशासकीय अधिकारी तसेच शिक्षण, उद्योग व व्यवसाय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० एप्रिल :** चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालय (डिग्री), लातूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी व उप-प्राचार्य डॉ. अविनाश टेकाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये गायन, नृत्य तसेच इतर मनोरंजक सादरीकरणांचा समावेश होता. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला तसेच शैक्षणिक दडपणातून काहीसा विरंगुळा मिळाला. प्राचार्यांनी आपल्या भाषणात कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले व अशा उपक्रमांचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. एकूणच, स्नेहसंमेलन कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून महाविद्यालयातील स्नेह, एकोप्याची भावना व उत्साही वातावरणाचे दर्शन घडवणारा ठरला. कार्यक्रमाचा समारोप चालू शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिक वितरण समारंभाने उत्साहात करण्यात आला.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, उप-प्राचार्य डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नशीर शेख, प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. रिशा वाले, प्रा. मोईन अत्तार, प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. अमोल नारागुडे, प्रा. विजयानंदा खडकुदकर, प्रा. जयश्री स्वामी, प्रा. भीमाशंकर हुच्चे, प्रा. बालाजी अजगुंडे, प्रा. प्रतिभा ठावरे, प्रा. प्रियंका तेलंग, प्रा. स्नेहल जोगदंड, प्रा. नेहा मुंढे, प्रा. दीक्षा विभुते, प्रा. अश्विनी भारती, प्रा. स्वस्तिका चामे, प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा. रोहित कोंबडे, प्रा. रचीता मालशेट्टे, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी, प्रमोद स्वामी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लातूर येथे केंद्रीय राखीव पोलीस दलामार्फत शौर्य दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० एप्रिल :** केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) दैदिप्यमान इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा ९ एप्रिल हा शौर्य दिन आज लातूर येथील सीआरपीएफ कॅम्पमध्ये मोठ्या अभिमानाने साजरा करण्यात आला. ९ एप्रिल १९६५ रोजी पाकिस्तानी सैन्याने गुजरातच्या कच्छ रणातील भारतीय चौक्यांवर कब्जा मिळवण्यासाठी 'ऑपरेशन डेजर्ट हॉक' सुरू केले होते. यावेळी सीमेवरील 'सरदार' आणि 'टाक' या चौक्यांच्या रक्षणाची जबाबदारी सीआरपीएफच्या दुसऱ्या बटालियनच्या जवानांवर होती. पहाटेच्या सुमारास पाकिस्तानी लष्कराच्या एका बलाढ्य ब्रिगेडने अचानक हल्ला चढवला, मात्र संख्येने कमी असूनही सीआरपीएफच्या जवानांनी अत्यंत धाडसाने हा हल्ला परतावून लावला. सलग १२ तास चाललेल्या या ऐतिहासिक लढाईत भारतीय जवानांनी पाकिस्तानी लष्कराचे ३४ जवान टिपले. एका निमलष्करी दलाने लष्कराच्या मोठ्या तुकडीला रोखून धरण्याची ही जगाच्या लष्करी इतिहासातील दुर्मिळ कामगिरी ठरली. याच शौर्याचे स्मरण म्हणून आज लातूर येथील रंगरूट प्रशिक्षण केंद्रात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक अमिरुल हसन अंसारी यांनी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या संबोधनात अंसारी यांनी जवानांच्या अतुलनीय धैर्याचा गौरव केला आणि उपस्थित सर्व जवानांना व त्यांच्या परिवाराला शौर्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.


## टि. सी. हरवली आहे

चंद्रकला कमलाकर झरकर या नावाची, महात्मा बसवेश्वर महाविघालय लातूर या कॉलेजची१२ वी पासची टि. सी. गांधी चौक ते मध्यवर्ती बसस्थानका दरम्यान हरवली आहे. सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा. योग्य ते बक्षित दिले जाईल. मु पो. सेलू (बु) ता. जि. लातूर


## शेत रस्त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० एप्रिल :** लातूर तालुक्यातील सारोळा येथील कायदेशीर असलेला ३७ वर्षापासूनचा शेतरस्ता, एक नवा शेत शेजारी सचिन शिवाजीराव हुडे यांनी मनमानी करत जब्बरदस्तीने अडविल्याने लातूर तालुक्यातील सारोळा येथील पीडित बापलेक युनूसखां पठाण आणि इम्तियाज पठाण या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ६ एप्रिल पासून बेमुदत धरणे आंदोलन सत्याग्रह सुरु केला आहे.

आज या आंदोलनाचा पाचवा दिवस आहे.. तरी देखील प्रशासनाने अद्याप दखल घेतलेली नाही. युनूसखां पठाण यांच्या कुटुंबात एकूण १७ जण असून सदर शेत जमिनीवरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. जर शेत रस्ता खुला करून मिळाला नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा आंदोलन कर्त्यां शेतकऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे नकाशावरील हक्काचा पूर्वापारपासूनचा रस्ता तात्काळ खुला करून द्यावा, अशी मागणी, यावेळी सत्याग्रहींनी मुख्यमंत्री व जिल्हाधिकारी आर्दीकडे एका निवनाद्वारे केली...शेजारच्या शेतकऱ्याने मनमानी करून, जब्बरदस्तीने सदर शेतरस्ता बेकायदा अडविला आहे. जेसीबीने त्या रस्त्याची नासधूस केली. लहान- मोठ्या वृक्षांची त्यानी कत्तल केली.

येथील सर्व पूर्व खुणांची नासधूस केली. आणि सदर संपूर्ण रस्ता गैर अतिक्रमणाने, आपल्या जमीनीत मिसळण्याचा प्रयत्न चालविला. तसेच यांना धमक्या देऊन, यांच्याच विरुद्ध सर्वत्र खोट्या तक्रारी पण केल्या. असा प्रकारे त्याने ३-४ वेळा केला. आणि ज्या-त्या वेळी, या अन्यायग्रस्त शेतक-याने शासन व संबंधित प्रशासनास, वेळोवेळी ४-५ निवेदने दिली. त्यावर महसूल मंत्री महोदय व जिल्हाधिकारी कार्यालयाने, तहसिलदारास ४- ५ लेखी पत्रादेश दिले. तरीही यांना न्याय काही मिळाला नाही. त्यामुळे या पिढीत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. आपल्या न्यायास विलंब वा टाळाटाळ झाली तर, आमचे संपूर्ण कुटुंब हे येथेच जाहीर आत्मदहन करेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या आंदोलनाला रामकुमार रायवाडीकर, सुरज पाटील, श्याम वारयाणी, संजय व्यवहारे, गणप तरावं तेलंगे, बाळ होळीकर, अफसर शेख, अंगदराव कांबळे, मेहबुब शेख, अली सय्यद, नवाब पठाण, गोपाळ चिकाटे, ॲड. डी. एन. भालेराव आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी या धरणे आंदोलन सत्याग्रहाला पाठिंबा दिला आहे.


## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचित करण्यात येते कि, माझे पक्षकार - देविदास पुंडलिक समुखराव, रा. म्हाळुंगी. ता. चाकूर, जि. लातूर, यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस माहितीस्तव खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांनी १. लक्ष्मण रावसाहेब शेळके, २. सौ. अनिता लक्ष्मण शेळके, दोघे रा. वैशाली नगर, सिद्धेश्वर चौक, लातूर. यांच्याकडून मौजे. पाखरसांगवी. ता. जि. लातूर येथील माझे पक्षकार यांनी शेतजमीन ठरावा पोटी इसार रक्कम देवून ठरावपत्र केलेला असून, ज्याचा लतर- १-द.क्रं.१५९/२०१९, दि.०७/०१/२०१९ ईसवी अन्वये असून,

नोंदणी तुकडी जिल्हा व जिल्हा परिषद लातूर पोट तुकडी तालुका व पंचायत समिती लातूर पैकी ग्रामपंचायत मौजे. पाखरसांगवी. ता. जि. लातूर. येथील जमीन गट नं. ३३ पैकीचा प्लॉट याचा एन. ए. झालेला प्लॉट याचा एन. ए. नं.२००४/ जेएमबी/लातूर/सीआर-१९५५, दिनांक - १५/०७/२००४ ईसवी अन्वये सबडिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नं. २५ चा पश्चिम भाग असून ग्रामपंचायत मि. नं. १९८६८ पैकीचा सदर प्लॉट ची साईज लांबी दक्षिण उत्तर दोन्ही बाजू ४० फुट व रुंदी पूर्व पश्चिम दक्षिण बाजू १९ फुट, उत्तर बाजू १४.५ फुट एकूण क्षेत्रफळ ६७० चौ. फुट (६२.२६ चौ. मी.) होत असून, सदर प्लॉट ची चर्तुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस सदर प्लॉटचा ऊर्वरीत भाग, पश्चिमेस प्लॉट नं. १६

दक्षिणेस २० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. ४२

येणे प्रमाणे वरील चर्तुः सिमेच्या आतील खुला प्लॉट चे विद्यमान मुळ मालक १. लक्ष्मण रावसाहेब शेळके, २. सौ. अनिता लक्ष्मण शेळके, दोघे रा. वैशाली नगर, सिद्धेश्वर चौक, लातूर. यांनी माझ्या पक्षकारा सोबत विक्री ठराव लेखी केला आहे. तसेच सदरील मिळकती निर्वेध व निजोखिम असल्याची हमी विद्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरी सदर खुला प्लॉट बदल जर कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन, शेजाऱ्यांचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत माझ्या खालील पत्त्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप नाही तर सदरील मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम समजून माझे पक्षकार आपल्या हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील मुदती नंतर आलेले कसल्याही प्रकारचे उजर आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकराक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

दि.०९/०४/२०२६

**लफे**
**ॲड. स्नेहा. पी. शेट्टी**
**नोटरी भारत सरकार**
**ऑफीस**
**तहसील कार्यालया शेजारी, लातूर.**
**मो. नं.९८६००२४८३८**

**जाहीर प्रगटन देणार**
**देविदास पुंडलिक समुखराव**
**रा. म्हाळुंगी.ता. चाकूर. जि. लातूर.**
**मो. नं. ९५०३४४४६४१**
**९०११३७९९०४**